तर तुमची तशीच इच्छा असल्यास मी तितक्या पैशाची तजविज करीन. या प्रमाणें उभयतांचे बोलणे होऊन नानासाहेब परत नगरास गेलें.

## जीवनांतील बाभळ आणि निवडुंग

नंतर कांहीं दिवसांनीं नानासाहेबास बाबांची दर्शन घेण्याची इच्छा झाली त्याप्रमाणें त्यांनीं एक दिवस नक्की करून आपल्या एक स्नेह्यास बरोबर घेऊन शिरडीस जाण्यासाठीं रात्रींच्या गाडीनें निघाले. व कोपरगांवास जरा थोडीसी रात्र असतांच आले. कोपरगांवीं येतांच त्याच्या मनांत आलं कीं, आतां आपण जर दत्तमंदिरांत दत्तदर्शनासाठी शिरलो, तर बोवा आपल्याला तीनशें रुपये मागतील. व त्यानें त्या रकमेची मागणी केली म्हणजे आपणास नाहीं म्हणतां येणार नाहीं. आपण इतकें पैसे बरोबरही आणले नाहींत, व इतक्या रकमेची आजपर्यंत सोयही केलेली नाहीं, तरी कसे करावे ? इतक्यांत त्यांना एक युक्ति सुचली कीं या खेपेस मंदीराजवळून न जातां दुसऱ्या मार्गानेंच परभारे शिरडीस जावें. त्यांनीं ही सर्व गोष्ट आपल्या स्नेह्यास सांगितली व त्यांचाही सल्ला विचारला. त्यांनाही नानासाहेबांचें म्हणणें पटलें. त्यांनीहि नानासाहेबास सुचलेल्या युक्तिप्रमाणें करण्याचा सल्ला दिला. नानासाहेबास बाबांनी काय धडा दिला होता, व प्रत्येक प्राणीमात्राच्या जीवनांतील लपंडाव व डावपेच तो शिरडीनिवासस्थ अंतरसाक्षी प्रभु बरोबर जाणतो हें नानासाहेबांच्या स्नेह्यास काय माहित ? नानासाहेबांना ही बाबांनीं दिलेल्या धड्याची विस्मृति झाली. म्हणून त्यांनीं नेहमीच्या रिवाजास फाटा देऊन दत्तदर्शन टाळून परभारें जाण्याचा विचार केला. कोपरगावांस जिकडे जावें तिकडे बाभळीं व निवडुंग. जरा अंधारच होता. व रस्ताही नेहमींचा नसल्यामुळें त्यांची व त्यांच्या स्नेह्याची फारच तारांबळ उडाली. व त्यांच्या पायांत व शरीराच्या इतरही भागांत कांटे बोचलें. व कसेतरी आडमार्गांतून नेहमीच्या सडकेस येऊन मिळाले. एकंदरींत त्यांचे आडमार्गावलंबनामुळें पुष्कळसे हाल झाले. पण करणार काय ? जाणून बुजूनच तो मार्ग पत्करला. पुढें चांगलें फटफटींत झाले; व दोघांनींही आपल्या शरीरांतील कांटे काढले व ते राजरस्ता चालूं लागले, व शिरडीस पोहोंचलें. नानासाहेबास बाबांच्या दर्शनाची अत्युत्कंठा. ते लागलीच मशीदीत गेलें. व बाबांच्या चरणाचें वंदन केले व बाबांच्या जवळ बसले. बाबा नानासाहेबांशी कांहींच बोलले नाहींत. सद्गुरुवचनामृताची नानासाहेब नेहमींप्रमाणें वाट पाहूं लागले. नेहमींची पद्धत अशी असें कीं, नानासाहेब आले कीं, काय नाना, केव्हां आलास, कसें काय ? वगैरे कुशल प्रश्न विचारावयाचें. या खेपेस नानासाहेब बराच वेळ बाबांच्या जवळ बसले तरी बाबा एक शब्दही त्यांच्याशीं बोलले नाहींत. आपली चूक कोठें झाली किंवा आपण बाबांचा धडा विसरलों हें नानासाहेबांच्या लक्षांत आले नाहीं. बाबांचे लक्ष दुसरीकडे कोठें गेले असेल व त्यामुळें ते नेहमींप्रमाणें आपल्याशीं बोलले नसतील. आतां बोलले नाहींत तर मग बोलतील, असें

नानासाहेबास वाटलें. थोडावेळ वाट पाहून ते वाड्यांत निघून गेले. बाबा कां बोलले नाहींत याबद्दल त्यांनींही कांहीं विचारले नाहीं. नानासाहेब वाड्यांत गेले खरे, पण बाबा आपणाजवळ बिलकुल बोलले नाहींत याबद्दल त्यांना हुरहुर लागली. त्यांचें चित्त व्यग्र झालें. त्यांस कांहीं सुचेना. त्यांस खिन्न वाटूं लागले. शिरडीस येऊन गुरुमाय बोलत नाहींत, मग शिरडीस यायचे तरी कशाला ? असेंही त्यांस वाटूं लागले. पुन्हां ते मशीदींत गेले. पुन्हां बाबांचें चरण वंदन केलें; व आतां तरी दोन शब्द बोलतील अशा अपेक्षेनें पुन्हां त्यांच्याजवळ बसले. पण बाबा कांहींच बोलले नाहींत. मग मात्र नानासाहेबांची निराशा झाली. व त्यांनीं बाबास न बोलण्याचे कारण विचारलें. बाबा म्हणाले, नाना, जो आपला धडा पाठ करीन म्हणतो व करीत नाहीं त्यांच्याशी आपण कशाला बोलावें. नानासाहेब म्हणाले, बाबा, आपण दिलेले धडे तर बरोबर ध्यानांत ठेवतो. बाबा म्हणाले, अरे गृहस्था, बोवा तीनशें रुपये मागेल म्हणून सरकारचें दर्शन टाळावयाचें व आडमार्गानें जावयाचें, ही धडा पाठ करण्याची कुठली पद्धत ! अरे तूं पैसे आणले नव्हतेस किंवा पैशाची सोय तुजकडून झाली नव्हती तर बोवा तुला काय खातो. त्यास सांगावयाचें कीं पैशाची अद्याप सोय झालेली नाहीं. परंतु बोवा पैसे मागेल म्हणून सरकार दर्शन टाळून आडमार्गानें जायचे ही कुठली पद्धत ! बरें तर मग, पायांत व आंगांत कांटे शिरलें कीं नाहीं ! या प्रमाणें बाबांचें बोल ऐकल्यावर बाबांच्या सर्वसाक्षीत्वाबद्दल नानासाहेबास अत्यंत कौतुक वाटून, त्यांना त्यांची चूकही कळून आली. आतां आपण अशी चूक पुन्हां करणार नाहीं, असें बोलून नानासाहेबांनीं पुन्हां त्या जगज्जनकांचें चरण वंदन केलें, व गुरुमाऊलीच्या भक्तवत्सलतेबद्दल व पारमार्थिक धडे देऊन त्यांची परीक्षा पहाण्याच्या आद्वितिय कुशलतेबद्दल धन्यता मानिली.

## भिकारीण आणि भाजणी

नंतर बरेंच दिवस लोटल्यानंतर एके दिवशीं नानासाहेब बाबांच्या दर्शनास गेले असतां बाबा म्हणाले, नाना आज तुला मीं एक दुसरा धडा देतो. नानासाहेब म्हणाले, फार उत्तम. बाबा म्हणाले, नाना, आपल्याकडे कोणी कांहीं मागावयास आल्यानंतर आपल्या शक्तीप्रमाणें व इच्छेप्रमाणें त्यांस द्यावें. व तेवढ्यानें तृप्त होत नसेल व तो जास्त मागत असेल तर त्यास गोड शब्दांनीं नाहीं म्हणून सांगावे. त्याच्यावर रागावूं नये, अथवा त्यांस आपल्या संपत्तीचा अथवा अधिकाराचा जोर दाखवूं नये. नानासाहेब म्हणाले, बरें मी आपण सांगितल्याप्रमाणें वागेन. याप्रमाणें बोलून बाबांस वंदन करून नानासाहेब परत गेले. धडा दिला कीं, त्याप्रमाणें वर्तन होते का होत नाहीं, याची परीक्षा पाहण्याची बाबांची पद्धत असें; म्हणून तर सांगितलेच आहे. याचा अनुभव खुद्द मलाही आला. व एके दिवशीं असा चमत्कार झाला कीं, ज्यावेळीं नानासाहेब कल्याणास होते, व घरांत आईसाहेबांनीं (नानासाहेबांच्या कुटुंबांनीं) एक डेराभर भाजणी नुकतीच तयार करून ठेवली होती तेव्हां एक भिकारीण नानासाहेबांच्या

वाड्यांत आली, व भीक मागूं लागली. घरांतील मंडळी नेहमींप्रमाणें नेहमींची भिक्षा घालूं लागली. भिक्षेकरीण म्हणें, मला ती भिक्षा नको. मला भाजणी पाहिजे. आईसाहेब म्हणाल्या तिला भाजणीच पाहिजे असेल तर घाला थोडीशी. त्यांच्या आज्ञेप्रमाणें मंडळी भाजणी घेऊन गेली व घालूं लागली. ती म्हणे, मला पुष्कळ भाजणी पाहिजे. आईसाहेबांनीं आणखी जास्त भाजणी आणली. तरी ती म्हणे छे मला पुष्कळ भाजणी पाहिजे. आईसाहेब म्हणाल्या, अग पुष्कळ पुष्कळ म्हणजे किती? माझ्या घरांत मुलें बाळें आहेत. भाजणी त्यांना लागते. ती अगदीं संपली होती. म्हणून परवाच मी नवीन केली. मी तुला पुष्कळ ती किती घालूं? ती म्हणें पुष्कळ घाल बरें. फारच कटकट करतेस, आर्धी घालतें. पण ती आपला पहिलाच हट्ट धरून बसली व घराबाहेर जाईना. ती भिकारीण आपला हट्ट कांहीं सोडीत नाहीं व घराबाहेरही जात नाहीं, असें पाहून त्यांनी ती गोष्ट नानासाहेब दिवाणखाण्यांत बसले होते, त्यांना जाऊन सांगितली. व आपण अर्धी भाजणी देण्यास कबुल झाले असतांना सुद्धां ती भिकारीण सर्वच मागते, व दिली नाहीं तर घरांतून हलतही नाहीं, तरी आपण जरा खाली यावें अशी त्यांना विनंति केली.

हें ऐकतांच नानासाहेबास राग तर आलाच. ते खालीं आले, व कोण आहेरे शिपाई तेथें; या भिकारणीला हाकलून लावा, असें रागनें म्हणाले. भिकारीण तरी भिकारीण आणि म्हणे सगळीं भाजणी द्या. सगळी भाजणी मागावयला लाज तरी वाटतें का? ध्यायची असेल तर देतात तितकी घे नाहींतर शिपायाकडून हाकून देतो. भिकारीण म्हणाली, महाराज, नसेल द्यायची तर नका देऊं सगळी पण शिपायाकडून गचांडी देऊन कशाला घालविता? मी आपली जाते. असें म्हणून ती भिकारीण निघून गेली.

पुढें कांहीं दिवसांनीं नानासाहेब बाबांच्या दर्शनास शिरडींस गेलें. मशिदींत जाऊन बाबांचें चरण वंदन केलें, व नेहमींप्रमाणें बाबांच्याजवळ बसलें. केव्हां आलास, कोणकोणमंडळी बरोबर आली आहेत, असे कुशल प्रश्न बाबांनीं नानासाहेबास मुळींच विचारीले नाहींत. बाबा आतां बोलतील मग बोलतील अशी वाट पहात नानासाहेब बराच वेळ बसले. पण बाबा त्यांच्याशीं मुळींच कांहीं बोलेनात. बाबांचें मौन नानासाहेबास असह्य होऊं लागले. ते मनांत विचार करूं लागलें कीं, बाबा आज आपल्याशी नेहमींप्रमाणें बोलत कां नाहींत? काय बरें झालें? काय चुकलें? कां बाबांनाच आज बरें नाहीं?

## नाट्याचार्य बाबा

याप्रमाणें हजारों तरंग त्याच्या मनांत घोळूं लागले. परंतु बाबांच्या मौनाचा त्यांना उमज पडेना, व तशा मुग्ध स्थितींत आणखी अधिक वेळ राहवेनाहीं. शेवटीं नानासाहेब म्हणाले, बाबा, आज आपण मी येथें आल्यापासून एकही शब्द बोलत नाहीं, हें काय? बाबा म्हणाले, जो आपला धडा गिरवींत नाहीं त्याच्याशीं काय म्हणून बोलावें? आपण सांगतां ते धडे मी बरोबर गिरवितों. मला तर कांहीं आठवत नाहीं कीं, आपण

सांगितलेला धडा गिरविण्यास मीं विसरलों. बाबा म्हणाले, मग त्या दिवशीं ती भिकारीण भाजणी मागण्यासाठीं आली होती व ती हट्ट धरून बसली होती व जास्त द्यायची नव्हती. तर अधिकाराच्या घमेंडीत तिला शिपायाकडून कशाला हाकलून लावित होतास ? ती कितीक वेळ तुझ्या दारांत बसलीं असती, व तूं तिच्या मागणीप्रमाणें तिला भाजणी दिली नसतीस, तर ती काय करती. कांहीं वेळ वाट पहात निघून जाती. मग गोड शब्दांनीं सांगण्याऐवजीं तिच्यावर रागावून तिला शिपायाकडून घालवून देण्यापर्यंत कां मजल आली. बाबा काय म्हणतात व हें केव्हां झाले याची प्रथम नानासाहेबांस स्मृतिच होईना. कारण या गोष्टीला जवळ जवळ पांच–सहा महिने झाले होते, व बाबा अशा प्रकारच्या भिकारणीचें सोंग घेऊन आपली परीक्षा घेतील याची कल्पनाही त्याच्या मनांत नव्हती. पुढें कांहीं वेळानें त्यांना या गोष्टीचें चांगलें स्मरण झालें व आपल्या हातून ही चूक झाली खरी असें जेव्हां त्यांच्या लक्षांत आले, तेव्हां ब्रह्मांडाच्या रंगभूमीवर पडद्याआड बसून मानवबुद्धिमत्तेपलिकडील अनंत लीलारूपी निरनिराळे देखावे दाखविण्यांत कुशल अशा नाट्याचार्य बाबांच्या परमार्थिक धड्यांचें व त्या धड्यांची परीक्षा पाहाण्याचें त्यांना अत्यंत सानंदाश्चर्य वाटले.

पुण्यश्लोका अनंता मजवरी रुससी का अशा ज्ञानवंता ।

एकांता सेवुनिया, कितितरि धरिसी मूकभावा महंता ।

श्रीकांता एक वेळा तरि वद मशि, दे दर्शना भाग्यवंता ।

चिंताऽहंता–विहंता, विनती परिस ही साई श्री एकदंता ॥

---


## ए. आर. सावंत ॲन्ड ब्रदर्स

**२६३, मंगळदास मार्केट समोर, मुंबई नं. २.**

ARSA PRODUCTS

**❀ होजियरी ❀ तयार कपडे ❀ फर्निशिंग फॅब्रीक्स**

व इतर सर्व तऱ्हेच्या कापडाचे व्यापारी

**रिटेलर्स व होलसेलर्स टे. नं. २२८४४**

"बाबांनो, देव दगडांत नाहीं, माणसांत आहे. दगडाधोंडाची पूजा करूं नका, माणसाची पूजा करा! माणुसकीचा धर्म हाच जगांतला श्रेष्ठ धर्म!" —असा मानवधर्माचा ज्यांनी शेवटच्या घटकेपर्यंत प्रचार केला ते—

# संत गाडगे महाराज

महाराष्ट्र हा संतांचा देश आहे. येथें दुसरें कांहीं पिकत नाहीं. पण संतांची वाणी मात्र अमाप पिकते. ही संतांची परंपरा गेलीं सात शतकें महाराष्ट्रांत अखंडित चालू आहे. लोकसेवेचें महान् मंदिर संतांनीं ह्या महाराष्ट्रांत उभारलें. त्याचा पाया ज्ञानेश्वरांनीं घातला. नामदेवांनीं त्याच्या भिंती बांधल्या. एकनाथांनीं त्यावर घुमट चढविला. तुकोबा त्याचे कळस झाले. आणि गाडगेबाबांनीं त्या कळसावर पताका चढविली. ज्ञानोबा-तो गाडगेबाबापर्यंत सर्व संतांचें म्हणणें एक कीं देव हा देवळांत नाहीं. दगडांत नाहीं. माणसांत आहे. पण दुर्दैवाची गोष्ट ही कीं, संतांनीं सात शतकें आकाश पाताळ एक केलें, तरी माणसांतला परमेश्वर अजून लोकांना दिसत नाहीं. त्यांना दगडांतला परमेश्वर दिसतो. गेलीं पन्नास वर्षें ज्या महापुरुषानें लक्षावधि लोकांना ओरडून सांगितलें कीं, "बाबानों, दगडाधोंड्याची पूजा करूं नका रे. माणसांची पूजा करा. 'तीर्थी धोंडा पाणी। देव रोकडा सज्जनीं!'" ते मानवधर्माचे महान् प्रचारक संत गाडगे महाराज ह्यांनी गेल्या आठवड्यांत आपली ऐंशी वर्षांची अलौकिक जीवनयात्रा अखेर समाप्त केली.

## बाबांचें चरित्र

असा लोकविलक्षण पुरुष ह्या भारतांत ह्यापूर्वी क्वचित्‌च जन्माला आला असेल. त्यांच्या चरित्राचा फारच थोडा भाग जगाला माहीत आहे. त्यांचें मूळ नांव डेबूजी. पण नागपूरकडे त्यांना चापरेबुवा म्हणत. कोकणांत गोधडे महाराज. सातार्‍याकडे लोटके महाराज. गोकर्णाकडे चिंधेबुवा. आणि पुण्या-मुंबईकडे गाडगे महाराज. बाळपण त्यांचें गुरें राखण्यांत आणि शेतीकाम करण्यांत गेलें. शाळेचें कधीं तोंड पाहिलें नाहीं. मग लिहितां वाचतां कुठलें येणार? पुढें लग्न केलें. संसाराला प्रारंभ केला. आणि वयाच्या अठ्ठाविसाव्या वर्षीं कोणातरी अज्ञात साधूच्या प्रेरणेनें त्यांना वैराग्य आलें. त्यानंतर घरदार, संसार सोडून बारा वर्षें ते रानावनांत आणि अज्ञातवासांत हिंडत होते. ह्या साधकावस्थेमधें त्यांनीं सर्व देशभर प्रवास केला. एकतारीवर कीर्तनें केलीं. गोरगरिबांच्या जीवनाचा अभ्यास केला. भिकार्‍यांची, लंगड्यापांगळ्यांची, महारोग्यांची आणि जनावरांची सेवा केली. आणि ही तपश्चर्या पूर्ण झाल्यानंतर एक दिवस ते आपल्या विचित्र अवतारामधें जगापुढें प्रकट झाले. डोक्यांवर झिंज्या अंगावर चिंध्या. तोंडावर दाढी मिशांचें जंगल. एका हातांत खराटा. आणि एका हातात मडकें. ह्याच स्वरूपांत गाडगेबाबा गेलीं पन्नास वर्षें एकसारखें जगांत वावरत होते. प्रारंभी लोकांना कळेना कीं हा

माणूस वेडा आहे का दूधखूळा आहे. कुठें कोणाच्या घरांत रहायचें नाहीं. भीक मागून भाकरीचा चतकोर तुकडा खायचा, खापरांतून पाणी प्यायचें. आणि ज्या गांवीं जायचें तें गांव हातांतल्या झाडूनें झाडून स्वच्छ करावयाचें. कांहीं दिवसांनीं लोकांना वाटलें कीं हा कोणी अवलिया दिसतो आहे. त्याबरोबर लोक पाया पडायला गेले कीं, त्यांच्या पाठीवर खराटा मारून ते पळालेच. उभ्या आयुष्यांत त्यांनीं आपल्या पायाला कोणाला हात लावू दिला नाहीं. किंवा भूतभविष्य सांगून अन् अंगारे देऊन बुवाबाजी केली नाहीं.

## कीर्तनाचें सामर्थ्य

कीर्तन हें गाडगेबाबांचें खरें सामर्थ्य. त्यांचें कीर्तन ज्यानें ऐकलें नसेल तो करंटा. आपल्या खेडवळ आणि लाडक्या वऱ्हाडी बोलीमध्यें तासन् तास ते हजारों श्रोत्यांना मंत्रमुग्ध ठेवीत. काव्य आणि विनोद ह्यांचा धबधबा त्यांच्या मुखामधून वाहावयाचा. गरिबांचा आणि दलितांचा उद्धार हा एकच त्यांच्या कीर्तनाचा विषय. देवळांत जाऊं नका. मूर्तीची पूजा करूं नका. देवापुढें पैसा फळें ठेवूं नका. तीर्थयात्रेला जाऊं नका. सत्यनारायण पुजूं नका. पोथ्यापुराणांतल्या चमत्कारवर विश्वास ठेवू नका. कोणाचा मंत्र नि गुरूपदेश घेऊ नका. प्राण्यांची हत्या करूं नका. सावकाराचें कर्ज काढू नका. अडाणी राहूं नका. ही शिकवण सतत पन्नास वर्षें हजारों कीर्तनें करून गाडगे बाबांनीं जनतेला दिली. सुशिक्षित आणि पांढरपेशा वर्गाच्या माणसांच्या वाऱ्याला गाडगेबाबा कधींही उभे रहात नसत. अडाणी, अपंग आणि दलित ह्यांचा उद्धार हें एकच त्यांचें जीवित कार्य होतें.

उभ्या आयुष्यांत बाबानीं कधीं अध्यात्मवाद सांगितला नाहीं. त्यांच्या एवढा व्यवहारी पुरुष क्वचित् होऊन गेला असेल. अंगावर चिंध्या आणि डोक्यावर खापर घालून ह्या अद्‌भुत माणसानें गेल्या पन्नास वर्षांत पन्नास लाख रुपये जमवले. आणि गरिबांसाठीं साऱ्या महाराष्ट्रांत ठिकठिकाणीं धर्मशाळा बांधल्या. पंढरपूरला अस्पृश्यांसाठीं एक लाख रुपयांची 'चोखामेळा' धर्मशाळा बांधून ती त्यांनीं डॉ. आंबेडकरांना देऊन टाकली. ह्या सर्व धर्मशाळांची व्यवस्था बाबांनीं इतकी सुंदर आणि नमुनेदार ठेवली आहे कीं, एखाद्या इंग्रजानें तोंडांत बोट घालावें. एवढें लाखों रुपये जमवून त्यांतील एका सुतळीच्या तोड्याला त्यांनीं कधीं हात लावला नाहीं. असा निरीच्छ आणि विरक्त पुरुष जगामध्यें क्वचित्च जन्माला आला असेल! बाबा म्हणजे खरोखर एक चमत्कार होता. त्यांच्या अंगामधें अनेक अलौकिक शक्ति होत्या, कीं ज्यांचें आकलन कोणालाहि होऊं शकलें नाहीं. गेल्या अर्ध शतकामधें महाराष्ट्रांतल्या सुशिक्षित पुढाऱ्यांनीं किंवा सार्वजनिक संस्थांनीं समाजसेवेचें जेवढें कार्य केलें, त्याच्या अनेक पटीनें अधिक प्रभावी कार्य ह्या एका माणसानें हातांत झाडू घेऊन आणि अंगावर चिंध्या घालून केलेलें आहे. रंजल्या गांजल्यांना 'आपुलें' म्हणणारा आणि अनाथ आपंगितांना हृदयाशीं धरणारा तो खरा साधु ही तुकोबांची व्याख्या गाडगेबाबांना अक्षरशः लागू पडते. किंबहुना ते तुकाराम महाराजांचेच अवतार होते असें म्हटलें तरी चालेल. माणसांमधल्या परमेश्वराची पूजा करणाऱ्या ह्या अलौकिक साधुपुरुषाच्या अवसानानें महाराष्ट्राच्या सार्वजनिक जीवनामधलें एक प्रचंड सामर्थ्य आज नाहींसें झालें आहे!

—मराठा

SHRI SAI SUPRASANNA

## For Information of Devotees

From 1 st January 1957 the present Dispensary Fund will be styled as "MEDICAL AID FUND, SHIRDI."

The aim of the fund is to give free medical relief to the needy and to have extension of the present Dispensary and / or a Hospital and a Nursing Home at Shirdi when necessary amount is collected. In appropriate cases, where injections and / or other costly treatment is necesray the same will be given at the discretion and advice of the Medical Officer incharge at Shirdi.

Voluntary liberal Donations for such a Righteous cause from Devotees are solicited and are welcome. Receipt Books for this head will be available at Sarkarkun Office, Shirdi, Medical officer, Shirdi, and at the Bombay Office of The Shirdi Samsthan. Devotees are requested to donate generously for this great cause.

In Service of Shri Sai,
**D. B. Rane**
**C. B. Velkar**
Jt. Hon. Sacretaries.

Bombay
Dec. 56.

श्री साई सुप्रसन्न

## भक्तांच्या माहितीसाठीं

ता. १ जानेवारी १९५७ पासून सध्यांच्या डिस्पेन्सरी फंडाचें नांव 'मेडिकल एड फंड, शिर्डी' असें ठेवण्यांत आलें आहे.

या फंडाचा उद्देश–रूग्णांना विनामूल्य औषधोपचार करणें, आणि आवश्यक ती रक्कम जमतांच सध्यांच्या दवाखान्याची वाढ करणें, एखादे नवें हॉस्पिटल अथवा नर्सिंग होम काढणें. गरजू आणि लायक रुग्णांना इंजेक्शन्स व इतर खर्चाचा उपचार, शिर्डी येथील मेडिकल ऑफिसर यांच्या सल्ल्यानुसार, करणें.

अशा सत्कार्यासाठीं सढळ हातानें भक्तजनांनीं देणग्या द्याव्यात अशी विनंति आहे. अशा देणग्यांचा मोठ्या आदरानें कृतज्ञतापूर्वक स्वीकार केला जाईल.

या फंडाची पावती–पुस्तकें खालींल ठिकाणीं मिळतील.

१. सरकारकून, शिर्डी संस्थान, शिर्डी
२. मेडिकल ऑफिसर, शिर्डी संस्थान, शिर्डी
३. श्री. शिर्डी संस्थानची मुंबई कचेरी

श्रीसाई–सेवाधीन,
**डी. बी. राणे**
**सी. बी. वेलकर**
सं. स. सेक्रेटरी.

मुंबई
डिसेंबर १९५६

पुन्हां पुन्हां सेवन केल्यानें ज्याची गोडी
उतरत नाहीं कीं अजीर्ण होत नाहीं
असें हें अमृततुल्य

# रमणोपनिषद

[ भारतवर्षांत जन्म घेणें यासारखी भाग्याची गोष्ट नाहीं. ती पुण्यभूमि आहे. ऋषी, मुनी, द्रष्टे यांचें हें निवासस्थान. आपल्या तीव्र तपश्चर्येनें, सत्यं शिवं सुंदरम् अशा परमतत्त्वाला पोहोंचलेलें महान् सत्पुरुष याच भूमींत निपजले. त्यांना झालेला निरतिशय आनंद उपनिषद्‌रुपी मंजुळ गानानें या भूमींत प्रथम उमटला. आज जगांत भारतवर्ष आपलें शीर उन्नत करून उभा आहे तें त्यांच्याच पुण्यबलावर !

भारतवर्षांतली ही पुण्यसंपत्ति सर्वत्र हिमगिरीच्या शिखरापासून तों भारतभूमिचे चरणप्रक्षालन करीत असलेल्या कन्याकुमारीपर्यंत सर्वत्र विखुरलेली आहे. परंतु विरागी महात्म्यांना सांसारिक विषयांपासून दूर राहणें आवडत असल्यानें तें आपल्या तपस्येसाठीं निबिड अरण्यें, गिरिकंदरें, निर्मनुष्य नदीतटाक नेहमीं पसंत करीत असतात; आणि अशीं स्थानें दक्षिण भारतांत अमूप आहेत. श्रीरमण महर्षींचा आश्रम त्यांपैकींच एक आहे. ]

"सर्व जीवमात्र नेहमीं दुःखरहित सुखाचा लालसा करतात, सुखाची लालसा हें प्रीतीचें कारण होय. पण तें सुख मिळविण्यासाठीं स्वतःचें स्वरूप जाणणें आवश्यक आहे. त्यासाठीं 'मी कोण ?' हा विचार प्रत्येकानें केला पाहिजे.

'मी' कोण ? सप्तधातूंनीं बनलेला हा स्थूल देह 'मी' नाहीं. शब्द, स्पर्श, रूप, रस, गंध या पांच विषयांचें ग्रहण करणारीं कर्ण, त्वचा, नेत्र, जिव्हा आणि नासिका हीं पंच ज्ञानेन्द्रियें म्हणजे 'मी' नव्हे. त्याचप्रमाणें पंचविध काय करणारी वाणी, पाय, हात, नाक आणि उपस्थ हीं पंच कर्मेन्द्रियें म्हणजेहि 'मी' नव्हे. श्वासादि पंच क्रिया करणारे, प्राणादि वायुपंचकहि 'मी' नव्हे. विचार करणारें मन पण 'मी' नाहीं. सर्व विषय आणि वृत्ती सोडून फक्त विषयवासनांच्या संगांत राहणारें अज्ञान पण 'मी' नाहीं. याप्रमाणें 'मी ह नाहीं,' 'मी तें नाहीं' असें म्हणून वरील सर्व उपाधींचा निरास केल्यानंतर जें एकमात्र चैतन्य अवशेष राहतें, तेंच 'मी' आहे ! या चैतन्याचें स्वरूप सत्-चित् आनंद हेंच होय.

सर्व जाणण्याचें साधन आणि सकल वृत्तींचें कारण मन आहे, म्हणून त्याचा

तेव्हां लय करण्यांत येतो तेव्हां जगद्दृष्टि (बहिर्दृष्टि) सुटते हेंच खरें. मन ही आत्मस्वरूपांत असलेली अपूर्व शक्ति आहे. सर्व वृत्ती मनच निर्माण करतें. परंतु सर्व विचार काढून टाकले कीं, मन अशी वस्तूच शिल्लक राहत नाहीं. विचार म्हणजेच मनाचें स्वरूप. विचार बंद झाले कीं जगत् अशी अन्य वस्तूच उरत नाहीं. सुषुप्तींत विचार नसतात, म्हणून जगत्‌हि नसतें. जागृतींत आणि स्वप्नांत विचार असतात, म्हणून जगत्‌हि असतें. कोष्टी ज्याप्रमाणें आपल्या आंतून तंतू काढून जाळें विणतो आणि परत ते आपणांतच सामावून टाकतो त्याप्रमाणें मन आपल्या आंतून जगत् दृश्यमान करतें आणि परत आपणांतच तें ओढून घेते. मन नेहमीं स्थूल वस्तूचा आश्रय घेऊनच टिकूं शकतें. तें स्वतः होऊन टिकूं शकत नाहीं. या मनालाच सूक्ष्म शरीर किंवा जीव असेंहि म्हणतात.

या देहांत 'मी' रूपानें जें प्रगट होतें तेंच खरोखर मन होय. देहांत कोणत्या ठिकाणीं 'अहंविचार' प्रथम स्फुरतो याचा विचार आतां करूं या. वस्तुतः हृदय हेंच मनाचें जन्मस्थान आहे. मनामध्यें उठणाऱ्या सर्व विचारांत 'अहं' विचार हाच प्रथम विचार आहे. हा जागृत झाल्यावरच दुसरे असंख्य विचार जागे होतात. प्रथम पुरुष 'मी' दिसल्यावरच द्वितीय तृतीय पुरुष 'तूं' आणि 'तो' हे दिसूं लागतात. प्रथम पुरुषाशिवाय द्वितीय आणि तृतीय पुरुष टिकूं शकणार नाहीत.

'मी कोण?' अशी विचारणा केल्यानें खात्रीनें मनाचा लय होतो. शव जाळणारी चिता प्रज्वलित करण्यासाठीं जी काठी वापरावी तीच जशी शेवटीं जळून जाते, त्याचप्रमाणें 'अहं' विचार दुसऱ्या सर्व विचारांचा ध्वंस करून स्वतःच नष्ट होतो. 'मी कोण' ही विचारणा चालविली कीं मन आपल्या जन्मस्थानांत—म्हणजेच हृदयांत—मागें वळतें आणि उठलेला विचारहि लय पावतो. याप्रमाणें जसजसा अभ्यास वाढत जातो, तसतशी आपल्या जन्मस्थानांत स्थिर राहण्याची मनाची शक्ति पण वाढत जाते. जेव्हां सूक्ष्म मन, बुद्धि आणि इन्द्रियें यांच्या द्वारें बहिर्मुख होतें, तेव्हां स्थूल नामरूपाचा भास होतो. परंतु जेव्हां मन हृदयांत स्थिर होतें तेव्हां नामरूप अदृष्य होतें. मनाला बहिर्मुख होऊं न देतां, हृदयांत स्थिर करणें याला अहंमुख किंवा अन्तर्मुख म्हणतात. मनाला हृदयाबाहेर भटकूं देणें याला बहिर्मुख म्हणतात. जेव्हां मन हृदयांत स्थिर होतें तेव्हां सर्व विचारांचें मूळ जें 'मी' तें अदृश्य होतें. वस्तुतः यालाच मौन म्हणतात. मौनाच्या या स्थितीचे दुसरें नांव ज्ञानदृष्टि हें आहे. आणि त्याचा अर्थ आत्मस्वरूपांत मनाचा लय करणें हा आहे. याच्या उलट, दुसऱ्याचें मन जाणणें, त्रिकालदर्शी ज्ञान मिळविणें, दूर ठिकाणीं होणाऱ्या घटना जाणणें इत्यादींना ज्ञानदृष्टि म्हणतां येत नाहीं.

मनाचा लय करण्यासाठीं आत्मविचाराशिवाय दुसरा कोणताहि योग्य उपाय नाहीं. अन्य उपायद्वारा जर मनाचा लय करण्यांत आला, तर लय पावलेलें मन परत उसळून बाहेर येतें. प्राणायामाच्या योगें मनाचा निग्रह होतो, परंतु जोंपर्यंत प्राणाचा निरोध करण्यांत येतो तोंपर्यंतच

मनाचा निग्रह टिकतो. ज्यावेळीं प्राणायाम थांबविण्यांत येतो, त्यावेळीं मन बहिर्गामी होऊन वासनेला वश होतें आणि इतस्ततः भ्रमण करतें. मनाचें आणि प्राणाचें जन्मस्थान एकच आहे. विचार मनाचेंच स्वरूप आहे. 'अहं' विचार हा मनाचा प्रथम विचार आहे आणि वस्तुतः तोच अहंकार होय. जेथून अहंकार जन्म पावतो तेथूनच श्वास उद्भवतो. म्हणून जेव्हां मनाचा लय होतो, तेव्हां प्राणाचाहि लय होतो आणि जेव्हां प्राणाचा लय होतो, तेव्हां मनाचा लय होतो. परंतु भर झोपेंत मनाचा लय होत असतांहि प्राणाचा लय होत नाहीं. मरण-कालपर्यंत मन प्राणाला देहांत धारण करून ठेवतें आणि मरणकालीं प्राण घेऊन तें प्रयाण करतें. म्हणून केवळ मनोनिग्रह करण्यासाठीं प्राणायाम सहायरूप होतो खरा, परंतु त्यानें मनोनाश होऊं शकत नाहीं.

प्राणायामासारखींच मूर्तिध्यान, मंत्र-जप यांच्या योगानें मन एकाग्र होतें. जेव्हां मन असंख्य विचारांत विभक्त होऊन राहतें, तेव्हां त्याचा प्रत्येक विचार अति बलहीन होत जातो. याच्या उलट, एकेक विचार जसजसें नष्ट पावत जातात, तसतसें मन एकाग्रता प्राप्त करून बल-वान् होत जातें आणि त्याला आत्मविचार सुलभ होतो.

ईश्वर आणि सद्गुरु वस्तुतः वेगळे नाहींत. आत्मविचाराशिवाय दुसरे जे विचार उठतात त्यांना लवलेशहि स्थान न देतां, आत्मनिष्ठेंत मग्न होऊन राहणें यालाच स्वतःस ईश्वरार्पण करणें किंवा सद्गुरूला शरणागत होणें असें म्हणतात. ईश्वरावर वाटेल तेवढा भार टाकला तरी तो सर्व भार वाहून नेतो आगगाडी सर्वांचा भार वाहून नेते असें जाणूनहि, आपण तींत बसून प्रवास करतांना आपलें बोचकें कोठेंतरी बाजूस ठेवून आराम करण्याऐवजीं तें बोचकें आपल्या डोक्यावर धारण करण्याचे कष्ट कां करावे ?

ज्याला अविनाशी सुख म्हणतात तें वस्तुतः आत्मस्वरूपच आहे. आपण सांसा-रिक वस्तूपैकीं एखाद्या वस्तूंत जें सुख मानतो तें खरें सुख नाहीं. आपल्या अविवेकी



● सचीव, वैद्य आणि गुरु हे तिघे भीतीनें किंवा लोभानें जेव्हां तोंडापुरतें गोड बोलतात तेव्हां राज्य, शरीर आणि धर्म ह्या तिघांचाही (अनुक्रमें) लवकरच नाश होतो.

विचारामुळेंच त्या वस्तूमध्यें आपण सुख मानीत असतों. जेव्हां मन बाहेर भ्रमण करतें, तेव्हां त्याला दुःखाचा अनुभव येतो. खरी गोष्ट अशी आहे कीं, जेव्हां आपल्या कामना पूर्ण होतात तेव्हां मन निश्चयपूर्वक यथास्थानांत मागें फिरते व त्यामुळेंच तें आत्मसुखाचा अनुभव घेतें. सुषुप्ति, समाधि आणि मूर्च्छासमयीं मन अन्तमुख होतें आणि त्या समयापुरता मन आत्मसुखाचा अनुभव घेतें. याप्रमाणें आत्मस्वरूपाचा त्याग करून बाहेर भटकणें आणि परत आंत येणें असा मनाचा अनन्त आणि कंटाळवाणा क्रम चाललेलाच असतो.

झाडाच्याखालीं सावलींत सुख आहे. बाहेर सूर्याचा कडक ताप आहे. बाहेरच्या उन्हाच्या तापानें त्रासून छायेमध्यें गेल्यावर माणसाला शीतलतेचा अनुभव येतो. थोडा वेळ तेथें राहून परत तो बाहेर येतो, पण कडक ताप सहन न झाल्यामुळें पुनः झाडाची छाया शोधतो. याप्रमाणें सावलींतून उन्हातापांत आणि उन्हांतून सावलींत ये जा चालूच असते.

सूर्याच्या इच्छा, संकल्प किंवा यत्नाशिवाय, ज्याप्रमाणें त्याच्या किरणांतील उष्णतेनें सूर्यकांतमणि अग्नि निर्माण करतो, कमळ विकास पावतें, पाणी आटतें, पृथ्वीवरील लोक आपआपल्या कार्यांत प्रवृत्त होतात आणि परत विराम पावतात, आणि ज्याप्रमाणें लोहचुंबकासमोर धरलेली सुई नाचूं लागते, त्याप्रमाणें कर्माधीन असलेला जीवमात्र आपआपल्या कर्मानुसार कार्य करतो आणि नंतर निश्चेष्ट दंडवत् पडतो. ज्याप्रमाणें सूर्याला लोकांच्या स्पर्श होत नाहीं आणि सर्वव्यापी आकाशाला चार भूतांचें गुण—अवगुण लागत नाहींत, त्याप्रमाणें व्यक्तिमात्राच्या आत्म्याला कोणत्याहि कर्माचा स्पर्श होत नाहीं.

सर्व शास्त्रें म्हणतात कीं भक्ति मिळविण्यासाठीं मनांचा निग्रह केला पाहिजे. मनोनिग्रहासाठीं 'मी कोण ?' ही विचारणा केली पाहिजे, पण शास्त्रद्वारां ती कशी करतां येईल ? खरें पाहिलें असतां, आपण स्वतःस ज्ञाननेत्रानें जाणलें पाहिजे. मी राम आहे हें जाणण्यासाठीं रामाला आरशाची जरूरी लागते काय ? जो 'मी' म्हणतात तो पंचकोशाच्या आंत आहे, पण शास्त्रें आहेत पंचकोशाच्या बाहेर ! बंधनांत कोण आहे याचा विचार करून आपलें यथार्थ स्वरूप जाणणें हीच मुक्ति होय.

जो कचरा झाडून फेंकून द्यावयाचा असतो त्याची तपासणी करण्याचें जसें प्रयोजन नसतें, तसेंच ज्याला स्वतःचें स्वरूप जाणण्याची इच्छा आहे, त्यानें स्वस्वरूप झाकणारी तत्त्वें गोळा करून फेंकून देण्याऐवजी तीं सर्व मोजत बसणें किंवा त्यांचे गुणदोष तपासीत बसणें हेंहि निष्प्रयोजन आहे.

जागृतावस्था दीर्घ असते व स्वप्नदशा क्षणिक असते; याशिवाय या दोहोंत दुसरा भेद नाहीं. जागृतींत होणारे सर्व व्यवहार ज्या प्रमाणांत सत्यासारखे भासतात त्याचप्रमाणांत स्वप्नांत होणारे व्यवहार त्यासमयापुरते सत्यच भासतात.

शुभ मन आणि अशुभ मन अशीं दोन मनें नाहींत. मन एकच आहे. मात्र वासना शुभ अशुभ अशी दोन जातींची होत असते. शुभ—वासनायुक्त मन शुभ आणि अशुभ—वासनायुक्त मन अशुभ म्हणतात.

जेव्हां अहंभाव उद्भवतो, तेव्हां सर्व कांहीं निर्माण होतें. जेव्हां अहंभावाचा नाश होतो, तेव्हां सर्व कांहीं विलोप पावतें. आपलें अंतिम 'श्रेय' यांतच सांठवलेलें आहे.

---

“ हे मना, मला सांग कीं, ह्या स्त्रीचं शरीर तुला पाहिजे कीं, परमात्मा पाहिजे ? पाहिलें हवें असेल तर तें तुझ्या पुढ्यांत आहे, आपल्याकडे तें ओढून घेण्यास तूं पूर्णपणें मोकळा आहेस ” विचाराचें असें आंदोलन सुरू असतां शारदा देवीच्या शरीराला स्पर्श करण्याकरितां श्री रामकृष्णांनीं आपला हात पुढें केला.

# त्या रात्रीं काय घडलें ?

‘ तूं इथं कशाला आली आहेस ? मायामोहांत मला ओढायचा का तुझा हेतु आहे ? ” श्री रामकृष्णांनीं तिला विचारलें.

‘ तसं कां बरं मी ओढीन ? आपल्या धर्मजीवनांत आपल्याला सहाय्यक व्हावं म्हणून आल्यें आहें मी ! आपली सेवा घडावी हाच हेतु. ती घडली म्हणजे सर्व कांहीं मला मिळालें. ’ श्री शारदादेवींनीं लगेच उत्तर दिलें.

शारदादेवींचें वय त्यावेळीं अठरा–एकोणीस वर्षांचें असेल नसेल. यौवनाच्या ऐन भरांत त्या होत्या. रम्य संसाराचीं सुखद स्वप्नचित्रें रेखाटण्यांत रंगून जावयाच्या त्या काळांत, तरुण स्त्रीच्या तोंडून असें उत्स्फूर्त उत्तर मिळणें किती आश्चर्यकारक ! श्री रामकृष्णांनाहि तसें उत्तर लगेच मिळेल असें वाटलें नव्हतें.

त्यांचा चेहरा प्रफुल्लित झाला. ते अंतर्यामीं सुखावले. अशा सहचरीची जोड करून दिल्याबद्दल त्यांनीं जगन्मातेचे मनांतून अनंत आभार मानले.

‘ आपल्याला सहाय्यक व्हावं म्हणून आल्यें आहें मीं ! ’ हें उत्तर त्यांच्या कानांत किती वेळ तरी घुमत राहिलें. आणि त्यांतच त्यांची तंद्री लागली. प्रसन्नतेचें चांदणें त्यांच्या चेहऱ्यावर पसरलें होतें.

शारदादेवींचें मुखकमलहि उत्फुल्ल झालें. अवर्णनीय अशा आनंदाचा आपल्यावर वर्षाव होत आहे असें त्यांना वाटलें.

पतीच्या जीवनहेतूचा उलगडा त्यांना स्पष्टपणें झाला होता. त्या हेतूला पोषक असाच आपलाहि जीवनहेतु असला पाहिजे याची त्यांना पूर्णपणें जाणीव झाली होती. आपल्या असाधारण पतीला सोबत करावयाची, तर आपला आयुष्यक्रमहि सर्वसामान्य स्त्रीहुन वेगळा— पतीच्या आयुष्यक्रमाशीं जुळणारा—असला पाहिजे याचा उमज त्यांना पडला होता.

पतीच्या महान् परमार्थिक प्रवासांत त्या सामील झाल्या. अनेक दिव्यांतून जावें लागलें. तलवारीच्या धारेवरचें तें चालणें

होतें. पण त्याची फिकीर त्यांनीं केली नाहीं.

श्री रामकृष्णांवर आतां दोन जबाबदाऱ्या येऊन पडल्या होत्या. पहिली, पत्नीच्या आध्यात्मिक शिक्षणाची व दुसरी स्वतःची समदृष्टि अचल ठेवण्याची. पहिली तितकीशी कठीण नव्हती. पत्नीची मनोभूमि शुद्ध व उच्च संस्कारक्षम आहे हें त्यांनीं पारखलें होतें. विशेषतः समर्पण बुद्धीनें वागणाऱ्या पत्नीला स्वतःच्या विचारसरणीप्रमाणें वळण लावणें दुर्घट नसतें. पण, जिचें यौवन भराला आलें आहे अशी मोहमूर्ति समोर असतां स्वतःची वृत्ती सम व स्थिर ठेवणें ही गोष्ट अत्यंत दुर्घट. आपण आतांपर्यंत जें प्रतिपादित आलों त्याची परीक्षा आतां व्हावयाची आहे; जगन्मातेनें कदाचित् तीच परीक्षा घेण्यासाठीं हें सारें घडवून आणलें असेल, असें त्यांना आतां वाटूं लागलें. जो खरोखरच ब्राह्मी स्थितीला पोंचला असेल, त्याला पत्नी ही कधींच विघ्नासारखी वाटणार नाहीं. तशी ती वाटत असेल तर त्याची ती ब्राह्मी स्थिति तकलुपी आहे असें समजावें. ब्रह्मज्ञानासाठीं धडपड करणाऱ्यानें मानसिक पावित्र्य राखण्यासाठीं स्त्री—पुरुष भेद राखला तर तें कांहीं वावगें नव्हे. पण खरी ब्राह्मी स्थिति त्याच्यापासून दूर असते. पण जो त्या स्थितीला पोंचला त्याच्यामध्यें हा भेदाभेद संभवतच नाहीं.

श्री रामकृष्ण हे क्रांतीप्रिय, प्रयोगशील वृत्तीचे पुरुष होते. त्यांना एखादी नवीन कल्पना सुचली कीं तिचे प्रयोग करून पाहून त्याप्रमाणें वागण्यास तें कधीं मागेंपुढें पाहत नसत. आणि त्यामुळेंच परमार्थमार्गांत पडलेल्या इतर व्यक्तीप्रमाणें त्यांनीं आपल्या समोर उभ्या राहिलेल्या पत्नीचा, वैराग्याचा बाऊ करून धिःकार केला नाहीं. त्यांनीं तिला आपल्यापाशीं राहूं दिलें, नव्हे तिचा तसा हक्कच आहे असें मानलें. तिला तिच्या मनाप्रमाणें आपल्याला सहाय्य करण्याची, आपली सर्व व्यवस्था ठेवण्याची पूर्णपणें मोकळीक दिली. इतकेंच काय, पण पहिले सहा महिने स्वतःच्या शय्येवर स्वतःच्या शेजारीं तिला निद्राहि घेऊं दिली. स्वतःची निष्ठा ते कसोटीला लावून पाहत होते.

एके रात्रीं शारदादेवी त्यांच्या शेजारीं शय्येवर निद्रित असतां ते उठून बसले आणि स्वतःशीं विचार करूं लागले. ' जग या शरीराला स्त्री म्हणून संबोधतें. तिला मिळविण्यासाठीं पुरुषाची केवढी धडपड. तिच्या उपभोगासाठीं काय काय प्रकार तो करीत असतो, कित्येकदां तो किती लाचार होतो ! तिच्या लाभासाठीं करूं नयेत तीं कृत्यें तो करतो. अशा पुरुषाला परमात्मप्राप्ती कधींच होणें शक्य नाहीं. तर मग मना ! अप्रामाणिक होऊं नकोस. आंत एक आणि बाहेर वेगळेंच असें भासवूं नकोस. मला सांग कीं, ह्या स्त्रीचं शरीर तुला पाहिजे कीं, परमात्मा पाहिजे ? पहिलें हवें असेल तर तें तुझ्या पुढ्यांत आहे, आपल्याकडे तें ओढून घेण्यास तूं पूर्णपणें मोकळा आहेस. ' विचारांचें असें आंदोलन सुरू असतां शारदादेवींच्या शरीराला स्पर्श करण्याकरितां त्यांनीं हात पुढें केला. तों त्यांच्या मनानें अशी कांहीं उचल खाल्ली कीं, ते तात्काळ समाधिमग्न झाले. सबंध रात्र त्याच स्थितींत ते होते.

याच काळांत एकदां एकान्तांत शारदा देवींनीं श्री रामकृष्णांना, त्याचे पाय चोळीत असतां विचारलें, 'आपण मजकडे कोणत्या दृष्टीनं पाहतां ?' त्यांच्याकडून लगेच उत्तर आलें, 'जी माता त्या पलीकडील मंदिरांत देवतारूपानें उभी आहे, मला जिनें जन्म दिला व जी समोरच्या नगारखान्यांत राहात असते, तीच येथें यावेळीं माझे पाय चोळीत बसलेली आहे. मूर्तिमंत मातृत्व तुझ्या रूपानं इथं वावरत आहे, अशी माझी भावना आहे. जगन्मातेचेंच तूं रूप आहेस. तुझ्याकडे पाहण्याची माझी दृष्टि ही अशी आहे.' सर्वसामान्य संसारी माणसाच्या कानाला ही भाषा कशीशीच वाटेल. पण श्री रामकृष्णांची ती नित्याची, खऱ्याखुऱ्या भावनेची निदर्शक होती. जगन्मातेचे ते उपासक होते. आपण तिचें बालक आहों असें ते मानीत. जगांतील साऱ्या स्त्रिया हीं त्या जगन्मातेचींच रूपें आहेत असें त्यांना वाटे.

श्री रामकृष्णांच्या मुखांतील ते शब्द ऐकून शारदादेवी थक्क झाल्या. त्यांचें मस्तक आदरानें नम्र झालें. अंतरांत कांहीं तरी एक नवी जागृति होऊन, त्यांच्या चेहऱ्यावर मंद, मधुर, शीतल असें तेज चमकलें. आपण कोण आणि आपलें या जगांत आगमन कशासाठीं झालें आहे याचा स्पष्ट प्रकाश त्यांच्या चित्तांत पडला.

या प्रसंगानंतर त्यांची जीवनसरिता संथपणें वाहूं लागली. स्तुतिवर्षावानें तीं कधीं उफाळली नाहीं किंवा निंदेच्या खट्याळ वाऱ्यांनीं ती कधीं खळाळली नाहीं.

"जगन्मातेचेंच तूं रूप आहेस," हे श्री रामकृष्णांचे उद्गार किती सत्य आहेत याची प्रत्यक्ष प्रचीति शारदादेवींना लवकरच आली.

१८७३ सालच्या मे महिन्याची २५ वी तारीख होती ती. फलहारिणी कालिकेच्या पूजेचा तो दिवस होता. प्राण्यांच्या पूर्वकर्मांच्या परिणामांचे क्षालन व्हावें यासाठीं कालीमातेची मोठ्या समारंभानें या दिवशीं पूजा होत असते. दाक्षिणेश्वर येथील कालीमातेच्या मंदिरांत सेवकांची व भक्तमंडळीची एकच धांदल, गडबड



● धूर हा जन्मतः कडू असतो, पण चंदनाच्या सहवासांत तो आपल्या कडवटपणाचा त्याग करतो.

उडाली होती. लतापताकांनीं, गुढ्या-तोरणांनीं, फल-पुष्पमालांनीं सभामंडप शोभिवंत केला जात होता. गाभाऱ्यांत पूजेची तयारी होत होती. देवडीवर सनईचौघड्याची धून उठली होती. देवळाच्या आवारांत जिकडे पहावे तिकडे उत्साह भरून राहिला होता. कोणी भजनें म्हणत होते, कोणी एकतारीवर भावपूर्ण वैष्णवगीतें म्हणत नाचत होते. उत्साहाची धुंद साऱ्यांनाच चढली होती.

श्री रामकृष्णांनीं आपल्या खोलीचीं कवाडें आज बंद केलीं होती. त्यांच्या खोलींत पूजेची तयारी चालली होती. आज ते देवीची स्वहस्तें पूजा करणार होते.

रात्र पडली. नऊ वाजले. शारदादेवी कवाड उघडून आंत आल्या. कवाडें बंद झाली. पूजेला प्रारंभ झाला. खोलीच्या पश्चिमेकडील दरवाजाजवळ पूर्वाभिमुख होऊन श्री रामकृष्ण बसलें. मंत्रोच्चारपूर्वक पूजासाहित्यावर जलसिंचन करून तें त्यांनी शुद्ध करून घेतलें. आणि पूजेची प्राथमिक तयारी होतांच देवतार्चनासाठीं मांडलेल्या चौरंगावर आसनस्थ होण्यास त्यांनीं शारदादेवींना सांगितलें. चौरंगावर मंत्रोच्चारपूर्वक आकृत्या काढल्या होत्या. शारदादेवी त्यावर बसल्या. मोहनास्त्राच्या अमलाखालीं असल्यासारख्या त्या वागत होत्या. श्री रामकृष्णांनीं मंत्रानें पवित्र केलेल्या पाण्याचें त्यांजवर अनेक वेळां सिंचन करून पुढीलप्रमाणें आवाहन केलें : ‘हे जगन्माते, हे सर्व शक्तींचे स्वामिनी, पूर्णत्वाचें कवाड माझ्यासाठीं उघड. तुझ्या आसनावर आरूढ झालेल्या या स्त्रीचा देह व तिचें मन पुनीत कर, आणि तिच्यांत तूं अवतरून तिच्या हस्तें जें जें कांहीं शुभ असेल तें तें घडीव.’ नंतर न्यासपूर्वक शारदादेवींना कालीदेवीच्या जागीं कल्पून त्यांनीं त्यांची पूजा केली. तिचे चरण आपल्या मांडीवर भक्तिभावानें घेऊन अळित्यानें ते हलकेच रंगविले, त्यांचे कपाळीं कुंकू लावलें, शारदादेवी अर्धजागृतींत, अर्ध-सुषुप्तींत होत्या. आणि पूजा संपली तेव्हां त्यांची पूर्णपणें समाधि लागली होती. समोर बसलेल्या श्री रामकृष्णांचीहि तीच अवस्था. भज्य आणि भजक या दोघांचेहि आत्मे एकमेकांत विलीन झाले होते. सत्-चित् आनंद स्वरूपांत दोघेंहि अथांग बुडालीं होतीं.

पूजा आतां संपली होती. खोलीचीं कवाडें उघडली गेलीं. बाहेरील शीतल वायु आंत शिरला. शारदादेवी हळुहळु भानावर येऊं लागल्या. त्यांनीं डोळे उघडले. समोर मस्तकनत करून हात जोडून श्री रामकृष्ण बसलेले होते.

आज आध्यात्मिक पूर्णतेचा परमोच्च बिंदु श्री रामकृष्णांनी गांठला होता. त्यांची आयुष्यभराची साधना आज सफल झाली होती.

शारदादेवी-श्री शारदामाता, आतां जगाच्या माता बनल्या. श्री रामकृष्णाचा भक्तगण त्यांना यापुढें ‘मा’ ‘माताजी’ म्हणून संबोधू लागला. आणि त्याहि तीं आपलीं मुलें या भावनेनें त्यांच्याशीं समत्वानें, वात्सल्यानें वागूं लागल्या.

१८८६ सालची १५ वी तारीख. संध्याकाळची काळी छाया आकाशांत गडद गडद पसरत चालली होती. घरांघरांतून हळुहळु दिवे लागूं लागले होते. जिकडे तिकडे अगदीं निःस्तब्ध होतें

मधुनच एखाद वेळेस रातकिड्यांचा किर्र किर्र असा कर्णकटु आवाज उठे.

श्री. रामकृष्ण बिछान्यावर निपचित पडले होते. त्यांचें शरीर शुष्क झालें होतें. चेहऱ्यावर ग्लानि आलेली होती. ते अकस्मात् उद्गारले; 'श्वासोच्छ्वास करणं मला कठीण होत आहे.' आणि ते एकदम समाधिमग्न झाले. या समाधीचें स्वरूप नेहमींहून वेगळें वाटूं लागलें. तें पाहून भोंवतालच्या शिष्यमंडळीपैकीं कांहींजण ओक्साबोक्शीं रडूं लागले. मध्यरात्रीनंतर श्री रामकृष्ण थोडेसे देह-भानावर आले. 'भूक लागली आहे मला,' ते म्हणाले. त्यावर त्यांना थोडीशी पेज पाजण्यांत आली. तेवढ्यानें त्यांना जराशी हुशारी वाटलेली दिसली. डाव्या कुशीच्या बाजूस रचलेल्या उशांच्या ढिगा-वर रेलून ते आपला लाडका शिष्य 'नोरेन' (स्वामी विवेकानन्द) याच्याशीं अगदीं खोल आवाजांत बोलूं लागले. अखेरचें, निरवानिरवीचें तें बोलणें होतें. आपल्या पाठीमागून आपलें नियोजित कार्य कसें चालू ठेवावयाचें यासंबंधींच्या सूचना ते त्यांना करीत होते. जें सांगायचें होतें तें सांगून होतांच त्यानीं कालीमातेच्या नांवाचा त्रिवार उच्चार केला व हळुच बिछान्यावर आपलें अंग टाकलें. आणि ते महासमाधींत शिरले; तेथून ते परत आले नाहींत. या जगांतील त्यांचा रहिवास संपला होता.

श्री शारदादेवींच्या आयुष्यांतील एक महान् भागीदार, आध्यात्मिक जीवनांतील एक थोर मार्गदर्शक, मृत्तिकेचें सुवर्ण करणारा किमयागार दृष्टिआड झाला होता; अनेकांचें शान्तिस्थान बनलेला एक विशाल वटवृक्ष उन्मळून पडला होता.

श्री शारदा माताजींच्या आयुष्यांतील एक पर्व आज संपलें होतें. नव्या पर्वांतील आयुष्यक्रम जुळवून घेण्याची तयारी करणें त्यांना प्राप्त होतें.

श्री रामकृष्णांचा देह अग्न्यर्पण केल्या-वर माताजी लौकिक रूढीप्रमाणें आपला सौभाग्यलंकार अंगावरून उतरवूं लागल्या तों काय चमत्कार! श्री रामकृष्ण समोर उभे. "काय करते आहेस तूं हें?" त्यांनीं विचारलें. "मी कुठं गेलेलों नाहीं. एका खोलींतून दुसऱ्या खोलींत गेलों आहें, इतकंच!" ते म्हणाले. माताजी त्याचा अर्थ उमजल्या. त्यांच्या अंतःकरणांतील दुःख पुष्कळसें निवालें. त्यांनीं आपला सौभाग्यालंकार—कंकणें—उतरलीं नाहींत. आपले पति आपल्याजवळच आहेत अशाच दृढ भावना त्यांनीं ठेविली. पुष्कळ वर्षेंपर्यंत त्यांनीं आपल्या हातांत सौभाग्यदर्शक बांगड्या ठेविल्या होत्या. लाल किनारीची साडीहि त्या नेसत. उत्तर वयांत त्यांनीं त्या सर्वांचा त्याग केला.

श्री रामकृष्णांच्या महासमाधीनंतर चौतीस वर्षें शारदा माताजी या जगांत पार्थिव शरीरानें वावरल्या. या काळांत ज्या कार्याकरितां त्यांच्या पतिदेवांचा अवतार होता, तें कार्य उत्तम तऱ्हेनें वाढीला लागून, त्यांच्या तत्त्वांचा प्रसार जगाच्या सर्व भागांत झालेला त्यांनीं पाहिला. 'हें विश्वचि माझें घर' असें मानणाऱ्या श्री रामकृष्णांचें पूजन, आशिया, युरोप व अमेरिका या तिन्ही खंडांत होत असलेलें त्यांना दिसलें. या तिन्ही खंडांत त्यांच्या संन्यासी मुलांनीं श्री रामकृष्णांच्या नांवानें मठ स्थापून वेदान्तधर्माची पताका उंच

फडकवित ठेविलेली त्यांनी पाहिली. धर्म, वर्ण, जाति यांच्या भेदाच्या भिंती कोसळून टाकून 'या रे या रे सारे जण, गुढी उभवूं आनंदानं' असें म्हणून धर्म-पंथातीत अशी श्री रामकृष्णधर्माची गुढी सर्व धर्मीयांना एकत्र आणून उभविली जात असल्याचें पाहून त्यांच्या नेत्रांचे पारणें फिटलें.

१९१८–१९ सालपासून त्यांच्यावर वार्धक्याच्या छाया दाट पसरूं लागल्या होत्या. माहेरच्या प्रपंचांतून, तसेंच इतर व्यवहारांतूनहि त्या लक्ष काढून घ्यावयाला लागल्या. सर्वांपासून पूर्णपणें अलिप्त राहण्याचा त्यांचा प्रयत्न सुरू झाला. आणि अंतसमयाच्या आधीं कांहीं दिवस तर, अत्यंत जिव्हाळ्यानें जवळ केलेल्या नातेवाईकांनाहि त्यांनीं निर्धारपूर्वक दूर लोटलें. भोंवतालची मंडळी याचा अर्थ समजली. महाप्रयाणाची ती तयारी होती.

१९२० सालच्या फेब्रुवारी महिन्यांत तापानें आजारी पडून त्या जयरामवटीहून कलकत्त्यास उद्बोधन मासिकाच्या इमारतींत राहावयास आल्या. त्यांचें शरीर कृश होऊन काळवंडलें होतें. या आजारांत त्या बिछान्याला कायमच्या खिळल्या. कोणतेहि वैद्यकीय इलाज उपयोगी पडले नाहीत. सहा महिने त्या बिछान्यांत कष्टदायक देहभोग भोगून आणि २० जुलै १९२० रोजीं पहांटे दीड वाजतां त्या श्री रामकृष्णांच्या चैतन्यांत लीन झाल्या.

त्यांचा देह मोठ्या सन्मानानें कलकत्त्याहून बेलूर येथें नेण्यांत येऊन, रामकृष्ण मठाच्या आवारांत गंगातीरावर अग्न्यर्पण करण्यांत आला. याच पुण्य-भूमीवर त्यांच्या नांवाचें एक छोटेंसें सुंदर मंदिर आज उभें आहे.

श्री माताजींच्या संबंधीं श्री रामकृष्ण-देव यांनीं म्हटलें आहे :

'ती ज्ञानस्वरूपी माता सरस्वतीचा अवतार आहे. जगाला ज्ञानाचा प्रकाश देण्यासाठीं तिचें आगमन झालेलें आहे.'

श्री माताजींचें आयुष्य इतकें साधें, सरळ आणि अवडंबररहित होतें कीं, त्याच्या अलोट महात्म्याची ओळख कोणालाच होऊं शकली नाहीं. स्वामी विवेकानंद यांना हें महात्म्य ओळखण्याचें भाग्य लाभलें होतें. त्यांनीं म्हटलें आहेः

'तुम्हां कोणालाहि श्री माताजी–श्री शारदादेवी–यांचें विस्मयकारक महात्म्य ओळखतां आलें नाहीं. पण तें लवकरच तुम्हांला कळून येईल. शक्तीविना जगताची पुनर्जागृति असंभवनीय असते. भारताच्या अधिष्ठानावर महाशक्तीची पुनर्स्थापना करण्यासाठीं श्री माताजींचा अवतार आहे. मैत्रेई आणि गार्गी यांचें पुनरागमन या जगांत होणें अवश्य आहे.'


## कै. पंडित मोतीलालजींचा दुसऱ्याच्या 'चष्म्यांतून पहाण्यास नकार

ब्रिटिश अमदानींतील असेंब्लींत स्वराज्य पक्ष ह्या विरोधी पक्षाचे कै. मोतीलालजी पक्षप्रमुख होते. एकदां पंडितजी चष्मा आणण्यास विसरले असतां एका युरोपियन एक्झिक्युटिव्ह कौन्सिलरनें आपला चष्मा पुढें केला. हजरजबाबी पंडितजी तत्काळ म्हणाले, "माफ करा, मी आपल्या चष्म्यानें (दृष्टीनें) पाहूं शकत नाहीं."

दुसऱ्याच्या चष्म्यानें (दृष्टीनें) पहाणें सदोष आहे. सबब दूरदृष्टि ठेवून निर्दोष चष्म्यासाठीं भेटा.

**शेंडे आणि कंपनी, चष्म्याचे व्यापारी,** बोरभाट लेन, गिरगांव, मुंबई ४.

काळोखांत चाचपडणाऱ्या जनतेला

दिव्यत्वाचा प्रकाश देणारे

# योगीराज अरविंदबाबू !

[ " आधुनिक काळांतील संतमहात्म्यांत प्रामुख्यानें ज्यांची गणना करतां येईल असे थोर पुरुष व महान् योगी म्हणजे श्री. अरविंद हेंच होत " असा ज्यांचा आदरपूर्ण उल्लेख सर सर्वपल्ली राधाकृष्णन् यांनीं केला आहे. त्यांच्या जीवनावर व योगसाधनेवर ओझरता दृष्टिक्षेप टाकण्याचा हा अल्पसा प्रयत्न आहे. तो वाचून पॉंडिचरी येथील साधकाश्रमांत त्यांच्या प्रेरणेनें चालू असलेलें नवमानव समाज निर्मितींचें कार्य समजून घेण्याची, कांहीं थोड्या वाचकांत जिज्ञासा उत्पन्न झाली तरीही लेखकास समाधान होईल. ]

" सरकार तुम्हांला हद्दपार करण्याच्या विचारांत असून लौकरच तुम्हांला पकडण्याचें वॉरंट बाहेर पडलें; तेव्हां त्यापूर्वीच भारताबाहेर जाऊन आपलें कार्य चालवावें हें प्राप्त परिस्थितींत मला तरी इष्ट वाटतें."

भगिनी निवेदिता यांनीं योगी अरविंद यांस भवितव्याची चाहूल अशा रीतीनें दिल्यानंतर तो ईश्वराचाच आदेश आहे असें समजून ते पुढील तयारीस लागले. तत्पूर्वी बॉंब–प्रकाराशीं व बंगालमधील क्रांतिकारकांच्या चळवळीशीं निकट संबंध असल्याच्या आरोपावरून त्यांना अटक करून चौकशीसाठीं अलिपूर जेलमध्यें बंदिस्त करून ठेवण्यांत आलें होतें. हा खटला एक वर्षभर चालू होता. त्या दरम्यान व तत्पूर्वीच्या काळांतही त्यांची योगसाधना चालूच होती. आलिपूर जेलमधील अंधारकोठडीच्या एकांतवासांत आपल्यावरील खटल्याचें काय होईल, त्या भयंकर आरोपांतून आपली सुटका होईल का नाहीं, या विवंचनेंत ते नव्हते. त्यांच्या वतीनें काम चालविण्यासाठीं सुविख्यात बॅरिस्टर चित्तरंजन दास हे पुढें आले होते. सर्व चिंतेचा भरिभार त्यांनीं त्यांच्यावर टाकिला होता. या काळांत ते ईश्वरध्यानांत इतके मग्न झाले होते कीं, तुरुंगांत, कोर्टांत किंवा जेथें जेथें त्यांना नेण्यांत येई तेथें तेथें त्यांना भगवंताशिवाय दुसरें कांहीं दिसत नव्हतें. सर्वत्र परमेश्वर भरलेला आहे अशी त्यांची भावना झालेली होती.

## देव तारी त्याला कोण मारी

त्यांच्या इतर सहकाऱ्यांस शिक्षा झाल्या परंतु अरविंद त्यांतून सहीसलामत बाहेर पडले. त्यांना खटल्यांत येनकेन प्रकारेण गुंतवून आपल्या मार्गातील हा कांटा दूर करावा यासाठीं तत्कालिन ब्रिटिश सरकारनें जंग जंग पछाडलें. परंतु म्हणतात ना कीं, ' देव तारी त्यास कोण मारी !'

श्री अरविंद बंधमुक्त झाले व बाहेर येऊन पहातात तों काय ? जिकडे तिकडे सामसूम ! लोकमान्य टिळकांसारखे महान् नेते सरकारनें अटकेंत ठेवले होते. दहशतवादाचा अंमल देशभर सुरू झालेला होता. सर्वत्र निराशेचें वातावरण पसरलेलें होतें.

बाहेर पडल्यानंतर आपल्या प्रांतांत ठिकठिकाणीं फिरून त्यांनीं जनतेची नाडी तपासून पाहिली; परंतु तिचे ठोके मंदावले होते. जनता दडपशाहीमुळें गारठून गेलेली होती. अशाही स्थितींत त्यांनीं '**कर्मयोगिन्**' व '**धर्म**' या नांवांचीं दोन साताहिकें जनता-जागृतीसाठीं व जनतेला आशेचा व कर्तव्याचा संदेश देण्यासाठीं सुरू केलीं.

हीं पत्रें आतां सरकारच्या डोळ्यांत सलूं लागलीं होतीं. आपण सर्वांना नामोहरम केलें, परंतु ही शक्ति अजून जिवंत आहे. आणि ती शक्ति अशी तशी नव्हती—ती महान् प्रभावी होती. त्या शक्तीचा विध्वंस कसा करतां येईल, या विवंचनेंत सरकार पडलें होतें. सर्वसत्ताधारी सरकारला काय ? वाटेल तें करतां येतें. लोकमान्य टिळक यांच्याप्रमाणें या महान् शक्तीला कुठेंतरी देशाबाहेर दूर नेऊन बंदिस्त करून ठेवावयाचें हा सरकारचा बेत नक्की झालेला होता.

## परमेश्वराची आराधना

योगी अरविंद यांनीं पाहिलें कीं या सरकारपुढें मानवी प्रयत्नांचें कांहीं चालण्यासारखें नाहीं. मानवी प्रयत्न निष्फळ आहेत. सरकार वाटेल त्या मार्गांनीं सत्तेचें बळावर कितीहि प्रभावी प्रयत्न असले तरी त्यांचा चक्काचूर करूं शकतें. सर्वसत्ताधारी असा परमेश्वर आहे. त्याची आराधना करून त्याचें सहकार्य मिळविल्याशिवाय आतां दुसरा मार्ग राहिलेला नाहीं.

भगिनी निवेदिता यांनीं दिलेली सूचना खरी व योग्य वेळीं दिलेली होती. योगी अरविंद यांनीं ती ईश्वरी प्रेरणा आहे असें समजून 'कर्मयोगिन्' पत्रांत 'माझ्या राष्ट्राला माझा अखेरचा संदेश' या मथळ्याखालीं एक लेख प्रसिद्ध केला व प्रात परिस्थितींत शक्तिसंपन्न अशा ब्रिटिश सत्ताधाऱ्यांकडून सत्ता हिरावून घेण्यासाठीं व देशाचें स्वातंत्र्य मिळविण्यासाठीं जनतेनें कोणत्या मार्गाचा अवलंब करावा यासंबंधीं आपले विचार प्रगट करून कोणालाही न सांगतां त्यांनीं चंद्रनगरला प्रयाण केलें. तेथें कांहीं दिवस एकांतवासांत व ध्यानधारणेंत घालवून फ्रेंच हद्दींतील पॉंडिचरी ही त्यांनीं आपली तपोभूमी मुक्रर केली.

## पॉंडिचरीस प्रयाण

चंद्रनगर येथून योगी अरविंद पॉंडिचरी येथें आले तेव्हां त्यांच्याबरोबर फक्त त्यांचे ४।५ निकटवर्ती सहकारी तेवढेच होते. १९१० ते १९१४ पर्यंत योगी अरविंद हे काय करीत आहेत व कोणत्या कार्यांत गुंतले आहेत याची फारशी कल्पना कोणालाही नव्हती.

मग या काळांत ते काय करीत होते ? आपले वेद व उपनिषदें यांचा त्यांनीं कसून अभ्यास चालविला होता. गीतेचीं पारायणें सुरू होतींच. जगांतील सर्व धर्मशास्त्रांचा अभ्यास त्यांनीं यापूर्वींच बडोदें

येथें असतांना पूर्ण केलेला होता. ग्रीक लॅटीन, फ्रेंच, रशियन, इटॅलियन किंवा अशी एकही भाषा नव्हती की जी त्यांना अवगत नव्हती. भारतांतील संस्कृत, बंगाली, हिंदी, मराठी, गुजराथी, तमीळ वगैरे सर्व भाषांचा व त्या त्या भाषांतील ग्रंथांचा त्यांनीं अभ्यास केलेला होता; परंतु गीता, वेद व उपनिषदें यांचा अभ्यास करीत असतां तेथें त्यांची तीव्र बुद्धि स्थिरावली. या खजिन्याची गुरुकिल्ली आपण हस्तगत केली पाहिजे, ब्रह्मविद्येचें हेंच सर्वश्रेष्ठ भांडार आहे अशी त्यांची खात्री पटली. तें कोठार स्वत:साठीं खुलें करून जगालाहि त्याची गोडी चाखायला लावावयाची अशा निर्धारानें त्यानीं 'आर्य' या नांवाचें मासीक इंग्रजी व फ्रेंच भाषेंत सुरू केलें. तें सतत ६।७ वर्षें चालू होतें. जगाच्या वाङ्मयांत व गीता, वेद, उपनिषदें यांचा अभ्यास करीत असतां जीं जीं बहुमोल रत्नें सांपडलीं त्यांचे सुंदर अलंकार तयार करून ते '**आर्य**' मासिकाच्या द्वारें त्यांनीं जगापुढें ठेविले. त्या काळांत (१९१४ ते १९२१) त्यांनीं उघडलेलें हें बहुमोल भांडार इतकें मौल्यवान् व विपुल होतें कीं, आद्यापिही ग्रंथरूपानें त्याचें पुनर्मुद्रण चालू असून तें अजून संपलें नाहीं. त्या काळांत तें जितकें मौल्यवान व मार्गदर्शक होऊन राहिलें होतें, तसेंच आजच्या काळांतही त्याची मौलिकता रेसभरही कमी झालेली नाहीं.

## योगासामर्थ्यावर श्रद्धा

श्री. अरविंदांचें योगसाधनेवर सर्व लक्ष केंद्रीभूत झालेलें होतें. या साधनेच्याच बळावर अशक्य गोष्टी आपणास शक्य कोटींत आणून सोडतां येतील याबद्दल त्यांची पूर्णतया खात्री झालेली होती. त्यांनीं आरंभिलेली ही साधना अत्यंत कठोर तशीच खडतर होती. सारे मोह त्यांनीं त्यासाठीं झुगारून दिलेले होते. बाह्य जगाशीं संबंध सोडलेले होते. पण त्यांनीं राजकारणांत पुन्हां पदार्पण करून देशाचें नेतृत्व स्वीकारावें यासाठीं मधून मधून थोर पुढाऱ्यांचे प्रयत्न सुरू होते. लाला लजपतराय, देशबंधु चित्तरंजन दास, कविवर्य डॉ. रविंद्रनाथ यांच्यासारखी थोर

॥ श्री साईनाथ प्रसन्न ॥

**भास्कर लक्ष्मण नार्वेकर**

नवीन फॅशनप्रमाणें, सोन्या–चांदीचे, कल्चर मोत्यांचे दागिने तयार मिळतील व ऑर्डरप्रमाणें तयार करून दिले जातील. तसेंच श्री. साईबाबांचीं सोनें–चांदीचीं लॉकेटस् व चांदीचे तयार फोटो मिळतील. एक वेळ भेट देऊन खात्री करा. सुंदर फॅशनेबल दागिने तयार करून घ्या.

**१८४, ठाकुरद्वार रोड, मुंबई २.**

माणसें भारतांत येऊन राष्ट्रीय सभेचें नेतृत्व स्वीकारण्याबद्दल त्यांना आग्रहाचें आमंत्रण करीत होतीं.

परंतु योगी अरविंद ध्रुवाप्रमाणें अढळ राहिले होते. त्यांच्या मनाचा निर्धार झालेला होता. या चळवळी, धडपडी व साऱ्या हालचाली फुकट आहेत. प्रचंड सत्ताधारी ब्रिटिश राजसत्तेपुढें कोणाचेंही शहाणपण चालण्यासारखें नाहीं. योगसामर्थ्य हेंच एकमेव सामर्थ्य आपल्या उपयोगी पडेल अशी त्यांची खात्री पटलेली होती व रात्रंदिवस पॉंडिचरी आश्रमांतील आपल्या एकांत खोलींत तीच साधना करण्यांत ते गढून गेलेले होते.

## साधूसंतांशीं संबंध

या काळांत अनेक साधुसंतांशीं श्री अरविंदांचा संबंध आला. आपणास आध्यात्मविद्या समजून घेतां यावी यासाठी त्यांचे अविरत प्रयत्न चालू होते. बडोदें येथें असलेल्या मुदतीत वाईचे योगाभ्यासी श्री. विष्णु भास्कर लेले यांची व त्यांची भेट घडून आली. त्यांनीं त्यांस एकांतवासांत नेऊन योगासाधनेची प्राथमिक तत्त्वें समजावून दिलीं व त्या मार्गांत त्यांचा प्रवेश करून दिला. हा बीजांकुर उत्तरोत्तर वाढत व फोफावत चाललेला होता.

स्वातंत्र्ययुद्धांत उडी घेतल्यानंतर सतत पांच वर्षांच्या काळांत त्यांनीं नाना प्रकारचे व शिकस्तीचे प्रयत्न करून पाहिले. त्यांची वाणी व लेखणी अत्यंत प्रभावी होती. त्यांनीं संपादिलेल्या 'वंदेमातरम्' पत्राकडे साऱ्या भारतीयांचें लक्ष एकसमयावच्छेदें करून लागून राहिलेले असे.

स्वातंत्र्याच्या चळवळींत वापरलेलीं सारीं शस्त्रें बोथट ठरल्याचा अनुभव आल्यानंतर ईश्वरी सत्तेचें पाठबळ मिळविण्यासाठीं व जगांतील मानवसमाजांत क्रांति घडवून आणण्यासाठीं श्री. अरविंद हे योगसाधनेकडे वळले. त्यांना योगसामर्थ्यसंपन्न व्हायचे होतें तें स्वतःच्या


॥ श्री साईनाथ प्रसन्न ॥

**बॉम्बे सिल्व्हर शॉप**

टेलिफोन ३८८६२

शुद्ध चांदीचा हरेक तऱ्हेचा माल बनविण्याचें व ऑर्डरप्रमाणें माल करून देण्याचें विश्वासलायक ठिकाण. त्याचप्रमाणें सोन्याचाही माल ऑर्डरप्रमाणें करून देण्यांत येतो. एकदां भेट देण्याची तसदी घेऊन खात्री करून घेण्याची विनंती आहे.

**बा. गो. जुवेकर**

मालक

गिरगांव, मांगलवाडी,
श्री धूतपापेश्वर प्रासाद, मुंबई नं. ४

॥ विमलेश्वर प्रसन्न ॥

**भा. रा. रेवणकर सराफ**

ठळकवाडी (बेळगांव)

**सोन्या-चांदीच्या तयार दागिन्यांचे व्यापारी**

आमचेकडे खडे मोत्यांचे सेटिंग्जचे आधुनिक पद्धतीचे दागिने, लफ्फे, तन्मणी, नेकलेस इअरींग्ज वगैरे तयार होतात.

बाहेरगांवच्या व्यापाऱ्यांचे ऑर्डरीकडे विशेष लक्ष दिलें जातें.


उद्धारासाठीं नव्हे. आतांपर्यंत योगसाधना करून ईश्वरस्वरूपीं लीन होऊन जाणाऱ्या व जीवन्मुक्त होणाऱ्या साधकाची भूमिका त्यांची नव्हती. सर्व मानवजात सुधारावी, त्यांच्या मनोभूमिकेंत जरूर तो क्रांतिकारक धारेपालट घडून यावा; मानव हा अतिमानव, देवपुरुष व्हावा, यासाठीं त्यांनीं पाँडिचरीच्या आपल्या आश्रमांत तपश्चरण, संशोधन व इतर साधकांचें मार्गदर्शन चार वर्षांपूर्वी समाधिस्त होईपर्यंत चालविलें.

## योगी अरविंदांची साधना

योगी अरविंदांना ईश्वरी साक्षात्कार व ईश्वराची भेट होऊन चुकलेली होती; परंतु त्यांना स्वतःसाठीं निर्वाणपद मिळवावयाचें नव्हतें. इतरेजनांसाठीं निर्वाणाचा राजमार्ग त्यांना खुला करावयाचा होता. त्या मार्गानें स्वतः गेल्यानंतर या जगांत आणखी करावयाचें असें कांहीं रहात नाहीं ही जी सर्व साधारण समजूत, त्या समजुतीला त्यांना ठोकर द्यावयाची होती. स्वतः देवत्व प्राप्त करून घेतल्यानंतर त्या देवत्वाच्या तेजानें सारें जग उजळून टाकावयाचें, त्या देवत्वाच्या तेजानें सारें जग उजळून टाकावयाचें, त्या देवत्वाच्या प्रकाशांत या जगांतील सर्व व्यवहार चालवावयाचे व त्या कार्यासाठीं काळोखांत चाचपडणाऱ्या जनतेला दिव्यत्वाचा प्रकाश देणारे व त्या साधनेंत मुरलेले साधक दीपस्तंभ सर्वत्र पसरावयाचे असा स्वरूपाची योगी अरविंदांची साधना होती.

ही महान् साधना फळास यावी यासाठीं योगी अरविंदांनी सतत चाळीस वर्षें पाँडिचरी आश्रमांत एकनिष्ठ साधना केली. त्यांचें अनुयायित्व पतकरून आपला फ्रान्स देश सोडून भारतांत आलेल्या माता मीराबाई ह्या त्यांच्यामागें त्यांचेंच कार्य आज पुढें चालवीत आहेत.

ता. १५ ऑगस्ट हा भारतीय स्वातंत्र्याचा जन्मदिवस. योगी अरविंदाचाही तो जन्म दिवस! असा हा अन्योन्य संबंध आहे.



- स्वतःच्याच उत्कर्षानें प्रसन्न होणारीं नदीसरोवरासारखीं अनेक माणसें जगांत आहेत पण दुसऱ्याचा उत्कर्ष पाहून (पूर्ण चंद्रोदय पाहून) ज्यांना प्रेमाची भरती येते असा समुद्रासारखा माणूस विरळा!

# साई–सुमनांजली

बाबा, पाय धरी सुखदायी।
तुम्हीच माझे तात न् आई ॥धृ०॥
पतीत–दीनां दर्शन देउन।
केलें पावन मंगल जन मन।
महिमा कुठवर करूं मी वर्णन।
भक्तांच्या हृदिं रमली साई–।
मूर्ति मनोहर शिरडी गांवीं ॥१॥
तव नामाचा घोष निनादे।
धूपसुमांचा सुगंध कोंदे।
दाहि दिशांतरिं साई नादें।
अंबर सारें भरून जाई।
कशी वर्णावी तव पुण्याई ॥२॥
भक्त जनांसी लावुनि माया।
शिणवलीस त्यांच्यास्तव काय।
विश्वंभर तू प्रेमळ छाया।
व्हावें ना मज अंतर साई।
शरणागत मी विनवी पायीं ॥३॥

●

मंगल नामीं जीवन रंगुन।
जाई शिरडीवरा॥
बाबा तारा मज पामरा॥ धृ ॥
सुंदर कोमल मानव काया
जडली माझी तिजवर माया।
विसरून गेलों मानव–कार्या।
भुललों भवसागरा॥ बाबा०॥
त्रस्त करिति मज महान् व्याधी।
लागे मार्गे काम–पारधी।
जयीं पाहिली नयनीं समाधी।
सुखशान्तीचा झरा॥ बाबा० २॥
ध्यास लागला तुमचा आतां।
दूर न लोटा साईनाथा।
चरणीं ठेवित पतीत माथा।
पावन मजला करा॥ बाबा० ३॥

—सुमन्तलाल धुरंधर

# श्री साईनाथाष्टक

डोईस फडकें अंगांत कफनी
ज्योतिप्रभा फांकली दिव्य वदनीं
चरणीं तयाच्या ठेवूनि माथां
नमस्कार माझा श्री साइनाथा ॥१॥
संसारयात्रा असे घोर फार
रात्रंदिनीं व्याप्त मोहांधकार
त्वन्नाम देईल प्रकाश पांथां
नमस्कार माझा श्री साईनाथा ॥२॥
वैकुंठ, कैलास, तूं ब्रह्मलोक
लीला तुझ्या अद्‌भुत त्या अनेक
जगदेकराया तूं विश्वनाथा
नमस्कार माझा श्री साईनाथा ॥३॥
काशी, गया, कांचि, अवंतिकाही
प्रयाग, मथुरा, पुरी, द्वारकाही
शिरडी असे साक्ष समस्त तीर्थां
नमस्कार माझा श्री साईनाथा ॥४॥
हिंदू, मुसलमान, इसाइ, जैन,
असो पारशी शीख सर्वांसमान
सेवाव्रताची तुझी धर्मगाथा
नमस्कार माझा श्रीसाइनाथा ॥५॥
असो स्पृश्य अस्पृश्य भेदा न थारा
इडेला पिडेला सदाचा दरारा
कलीकाल आला, निवारी अनर्था
नमस्कार माझा श्रीसाइनाथा ॥६॥
येते जयीं मानव–धर्म–ग्लानी
घेशी तदा तूं अवतार अवनीं
संकेत हा देत गीताइ पार्थां
नमस्कार माझा श्रीसाइनाथा ॥७॥
तुझें रूप ध्यावें तुझें नाम घ्यावें
तुझ्या कीर्तनीं नित्य तल्लीन व्हावें
दयाळा, कृपाळा, स्वयंभू, समर्था!
नमस्कार माझा श्रीसाइनाथा ॥८॥

—बबन पांडगांवकर





# श्री साई गाथामृत

ना. वा. गुणाजी

## विरागी भगद्रत्न म्हाळसापति

[ जुलैच्या अंकांत श्रीसाईबाबाचे अत्यंत निकटवर्ती भक्त श्रीमाधवराव देशपांडे **भक्त सखा** शामा यांची कथा सांगण्यांत आली. आतां त्यांच्यासारखेच निकटवर्ती विरागी भगद्रत्न श्रीम्हाळसापति आणि त्यांचे मित्र श्री. काशीराम शिंपी आणि श्री. आप्पाजी जागले यांची मनोरंजक आणि उद्बोधक कथा सांगण्यात योजिलें आहे. ]

**म्हाळसापतीचें वैशिष्ट्य–साई-नामाभिधान.**

भगवान् किंवा सच्चिदानंद दयाघन पतीतपावन परमात्मा हा निर्गुण निराकार आहे. त्याला नामरूप नाहीं. पण '**भक्ताचीया काजासाठीं । साधूंचिया प्रेमासाठीं,**' तो अवतार घेतो म्हणजे साकार होतो आणि भक्तहि त्याला निरनिराळ्या नांवांनीं संबोधितात. श्री साईबाबा हे परमात्म्याचे अवतार. ते भक्ताचीया काजासाठीं' या पृथ्वीतलावर प्रगट झाले आणि त्या अनामिक परमात्म्याला श्री 'साईबाबा' हे नामाभिधान कसें प्राप्त झालें तें ऐका—

समर्थ रामदास गोदातीर सोडून जगदुद्धाराकरितां कृष्णातटाकीं प्रगट झाले, "तैसेच हे योगेश्वर साई । महान् शिरडीची पुण्याई ॥ जगदुद्धाराचिये पायीं । गोदे ठायीं अवतरले ॥" (श्री साईसच्चरित अ. ४, ३८.) तैसेच हे श्री साईनाथ । तरुण सोळा वर्षांचे वयांत ॥ निंबातळीं शिरडी गांवांत प्रथम भक्तार्थ प्रगटले' ॥ (श्रीसाई सच्चरित अ.५।१११ ) नाना चोपदाराची वृद्ध आई हिनें याचें थोडक्यांत असें वर्णन केलें आहे कीं—

'म्हणे आरंभीं हें पोर। गोरेंगोमटें अति सुंदर। निंबातळीं आसनी स्थिर। प्रथम दृग्गोचर जाहले' (अ.४–११७) 'बाह्या-त्कारीं दिसे पोर। परी कृतीनें थोरांहूनी थोर॥ वैराग्याचा पूर्ण अवतार। आश्चर्य फार सकळिका (अ. ४–१२३) पुढें एके दिवशीं असें नवल झालें कीं, खंडोबा देव भक्तांच्या अंगांत आला. त्यावेळीं त्याला या सभाग्याचें पोर, कोण कोठून आलें इत्यादि प्रश्न लोकांनीं विचारले. देवानें लोकांना एक भुयार दाखविलें आणि सांगितलें कीं, "चुने-गच्ची तें तळघर। गोमुखी, पाट, माळ सुंदर॥ देव म्हणे बारा वर्षें हा पोर। तप आचरला ये स्थळीं"॥ (अ.४. १२९) लोकांनीं बाबांना याविषयीं प्रश्न करितां त्यांनीं सांगितलें कीं, हें माझ्या गुरूचें अति पवित्र स्थान आहे, याचें नीट जतन करा; गुरुवारीं आणि शुक्रवारीं सायंकाळीं या ठिकाणीं ऊद जाळणाऱ्याला श्रीहरि सुख देतील. या जागीं बाबा कांहीं वर्षें राहून तेथें गुप्त झाले आणि पुढें चार वर्षांनीं त्यांचें शिरडींत पुनरागमन झालें, तें असें :

## चांदभाई पाटील

औरंगाबाद जिल्ह्यांत धूप खेडेगांवांत एक भाग्यशील चांद पाटील नांवाचा गृहस्थ होता. औरंगाबादेची सफर करितांना त्याची एक उमदी घोडी हरवली. तिच्या शोधार्थ तो फिरत असतां औरंगा-बादेहून चार कोसांवर आंब्याच्या झाडा-खालीं एक रत्न (बाबा) दिसलें. बाबांच्या कृपेनें त्यांची घोडी मिळाली आणि दुसरे दिवशीं बाबा चांद पाटलाच्या घरीं गेले. आणि तेथें कांहीं दिवस राहिले. त्यानंतर चांद पाटलाच्या बायकोच्या भाच्याचें लग्न ठरलें. वधु शिरडीची होती तेव्हां गाड्या घोडीं घेऊन लग्नाचे वऱ्हाड शिरडीस निघाले. त्यांत बाबाहि सामील झाले. शिरडी गांवाच्या बाहेर रस्त्याच्या पलीकडे खंडोबा देवाचें पटांगण आहे तेथें म्हाळसा-पतीचे खळ्यांत, वडाच्या झाडाखालीं गाड्या सोडल्या, आणि तेथें सर्वांसमवेत बाबाहि उतरले. 'हे बाल फकीर गाडींतून उतरले। प्रथम भगताचे (म्हाळसापतीचे) दृष्टीस जें पडलें॥ '**या साई** म्हणून सामोरे गेले। नाम तें पडलें तेथून॥ पुढें मग तेव्हांपासून। साई साई ऐसें म्हणून॥ मारूं लागले हाक ही जन। **नामाभिदान** तें झालें॥ (अ. ५. २९३०) 'साई' म्हणजे कांहीं विशेष नाम नव्हे, तें सामान्य नाम असून त्याचा अर्थ फकीर असा आहे. पण या प्रकरणांत सामान्य नाम विशेष नाम होऊन बसलें. साईचें स्वरूप हेमाडपंतानीं असें सांगितलें आहे कीं–साई अविनाश पुरातन। नाहीं हिंदू ना यवन॥ जात–पात–कुळगोत्र-हीन। स्वरूप जाण निजबोध॥ (अ. ५२४)

सुप्रसिद्ध साईभक्त, ऑल-इंडिया साई समाजचे अध्यक्ष, बी. व्ही. नरसिंह स्वामी हे नुकतेच ता. १९–१०–५६ ला निर्वाण पावले. यांनीं गेल्यावर्षी 'Life of Sai Baba' नांवाचा इंग्रजी ग्रंथ प्रसिद्ध केला आहे. त्यांत त्यांनीं या प्रसंगाची हकीगत पान २२–२३ वर प्रसिद्ध केली आहे ती अशी–बाबा जेव्हां प्रथम शिरडीस आले, तेव्हां गांवाबाहेर असलेल्या खंडोबा देवालयाकडे गेले, आणि

तेथील निर्जन (एकान्तवासाची) आणि शांत जागा पाहून असे उद्गारले कीं, माझ्यासारख्या तपस्व्याला राहण्याला ही जागा किती उत्तम आहे. तेथें हजर असलेल्या म्हाळसापतीला हे उद्गार आवडले नाहींत आणि ते म्हणाले कीं, या खंडोबाच्या देवालयांत कोणाहि मुसलमानाला पाय ठेवूं दिला जाणार नाहीं. बाबांनी म्हाळसीपतीची ही वृत्ति पाहून ती जागा सोडली आणि गुरुसमाधीपाशीं असलेल्या 'गोड' निंबवृक्षाकडे गमन केलें. या हकीगतीला पुरावा न दिल्यामुळें आणि बाबांच्या सम्मतीनें आणि आशिर्वादानें तयार झालेल्या अधिकृत ग्रंथांत साईचरित्रांत याचा उल्लेख नसल्यामुळें ती ग्राह्य आहे असें आम्हास वाटत नाहीं. आतां आपण श्री. म्हाळसापतीच्या जीवनचरित्राकडे वळूं.

**जीवनचरित्र**—श्री. म्हाळसापतीचा जन्म केव्हां झाला याविषयीं नक्की माहिती मिळत नाहीं. मरणसमयीं त्यांचें वय अजमासें ८५ वर्षांचें असावें. त्यांची मरणतिथि भाद्रपद कृ. ६ मंगळवार शके १८४३ आहे. त्यावरून त्यांचा जन्म शके १७५८ च्या सुमारास असावा असें दिसतें.

म्हाळसापति हे जातीनें सोनार असून ते पिढीजाद शिरडीचेच राहणारे होते. त्याचे तेथें एक १४–१५ खणी घर व अजमासे ७–७॥ एकर इतकी इस्टेट होती. ते प्रथम पुणें जिल्ह्यांतील जेजुरीच्या खंडेरायाचे भक्त होते आणि वर्षांतून एक वेळ ते जेजुरीची वारी करीत असत. त्यांचें कुळदैवत खंडेराय होते आणि त्यांवर त्याचें अप्रतिम प्रेम व अलोट निष्ठा होती. पुढें श्री साईबाबांवरहि तितकेंच प्रेम आणि निष्ठाही जडली. बाबा समाधिस्त होईपर्यंत त्यांनीं त्यांचे पाय सोडले नाहींत आणि बाबा समाधिस्त झाल्यावर त्यांनीं चार वर्षांचें आंत आपला देह ठेविला.

**धंदा**—म्हाळसापति सोनाराचा धंदा करून आपला संसार करीत होते. तरी ते स्वभावानें पूर्ण विरक्त होते. त्यांचा धंदा नीट चालेना, तेव्हां त्यांनी तो धंदा सोडून देवाच्या दृष्टांताप्रमाणें भिक्षावृत्तींवर अवलंबून राहण्याचें सुरू केलें. भिक्षा मागून जें कांहीं मिळेल त्यावर निर्वाह करून ते संतोष मानीत असत. पुष्कळ मंडळींना त्यांची गरिबीची कींव येऊन ते त्यांना द्रव्य देण्यास जात असत, पण पैशाच्या लालुचीला ते कधींहि भुलले नाहींत. बाबांनीं सांगितलें तरच पैसा किंवा इतर वस्तु स्वीकारावयाची, नाहीं तर नाहीं. त्याची ही विरागी आणि निस्पृहवृत्ति पाहून कोणतीहि वस्तु किंवा पैसा घेण्याचा त्यांना कोणी आग्रह करीत नसत. अति आग्रहामुळें कांहीं वस्तु किंवा पैसा घेणें भाग पडलें तर त्याचा उपयोग ते आपल्या संसाराकडे न करतां देवधर्माकडे किंवा गोरगरिबांना दानधर्म करण्याकरितां करीत. बाबांनीं त्याची परीक्षा पाहण्यासाठीं किंवा अन्य कारणासाठीं त्यांना द्रव्य घेण्याचा आग्रह केला असतां त्यांनीं तें नाकारलें आणि म्हटलें कीं, बाबा, मला पैसे बैसे कांहीं नकोत, मला फक्त तुमचे पाय पाहिजेत. खरोखर केवढी ही निस्पृहता आणि निरिच्छता आणि गुरुभक्ति !

**संतति**—श्री. म्हळसापतींना चार मुली–जानकीबाई सीताबाई, रखुमाबाई

व विठाबाई अशा होत्या आणि त्या अनुक्रमें अस्तगांव, डोचळे, डोंऱ्हाळे आणि सेई या गांवीं दिल्या होत्या. शिवाय दोन मुलगे झाले. पहिला मुलगा लवकरच वारला. त्यामुळें त्याचें मन संसारांतून उठलें; पण बाबांच्या कृपेनें त्यांना दुसरा मुलगा झाला. तो उपवर होऊन त्याचें लग्न होऊन त्याला संतती, मुलेंबाळें झालीं आहेत.

श्री. म्हाळसापतीला आलेले अनुभव त्यांनीं स्वतः आपल्या चिरंजीवाला मार्तंड भाऊला सांगितले होते. ते त्यांनीं लिहून ठेविले होते. त्यावरून श्रीसाईलीला वर्ष ११ अंक ९–१० (शके १८५६) यांत श्रीबाबांचे विद्वान व प्रेमळ भक्त–'बाबांचें बाळ' म्हणून प्रसिद्ध असलेले श्री. देव मामलेदार यांनीं विस्तृत लेख प्रसिद्ध केला आहे. त्या आधारावरून ह्या लेखांतील माहिती देण्यांत येत आहे.

शिरडींत श्री. काशीराम शिंपी आणि श्री. आपाजी जागले असे दोघे म्हाळसापतीचे मित्र होते. या तिघांचा स्वभाव मिळताजुळता असल्यामुळें ते तरुणपणीं नानाप्रकारचे खेळ खेळून रमत असत. कोणी साधुसंत अगर पाहुणा गांवांत आला तर त्याची राहण्याची व जेवणाखाण्याची व इतर सोय हें त्रिकूट पाहत असे आणि योग्य प्रकारें त्यांचा आदरसत्कार करीत असत. गोसावी पाहुणा आला तर 'नमोनारायण,' वैरागी पाहुणा आला तर 'जयराम' आणि फकीर पाहुणा आला तर 'जयसाई' असें त्याला सादर व सप्रेम संबोधीत असत. हा सत्कार बहुतेक म्हाळसापति करीत. काशीराम शिंपी शिधापाणी देत आणि आप्पा जागले सरपण, भांडीं वगैरे सामान पुरवीत. म्हाळसापति हे पाहुण्याचें पादसंवाहनहि करीत असत.

**बाबाचें शिरडींत आगमन**— धूपखेड्याच्या चांद पाटिलाच्या घरच्या लग्न वऱ्हाडाबरोबर बाबा शिरडींत आले आणि खंडोबाच्या देवळासमोरील पटांगणांत म्हाळसापतीच्या खळ्यांत उतरले, तेव्हां 'या साई' म्हणून म्हाळसापतीनें त्याचें सुस्वागत केलें इत्यादि हकीगत वर आलेली आहे. पुढें म्हाळसापतीनीं बाबांना नमस्कार करून बसविलें आणि आपली पूजा संपल्यावर त्याचेबरोबर चिलीम ओढली आणि त्यांना बरोबर घेऊन गांवांतील मशीदींत नेऊन बसविलें आणि आपल्या मित्रमंडळीची गांठ घालून दिली. त्यानंतर बाबा आणि ही मित्रमंडळी नेहमीं गाणें बजावणें करीत, अनेक प्रकारचे खेळ खेळत आनंदानें कालक्रमणा करूं लागली. आणि लवकरच हे तिघेहि बाबाचे पूर्ण भक्त बनले.

**बाबांचा पोषाक**—या वेळीं बाबा भगवी किंवा पांढरी कफनी घालीत असत. काशीराम शिंप्यानें त्यांचेकरितां हिरवी कफनी व हिरवी टोपी तयार करून दिली, पण बाबा बहुतेक पांढरीच कफनी घालीत आणि डोक्यास धोतर बांधीत. 'केश माथ्याचे सबंध राखीत। डोकें न कधीं मुंडवीत॥ पहिलवानासम पेहराव करीत। तरुण वयांत हे साई' असें श्रीसाईसच्चरितांत, (अ. ५. ४५) वर्णन केलेलें आहे.

**काशीराम शिंपी याची बाबांवर निष्ठा व त्याचा पराक्रम**—काशीराम शिंपी हा बाबाला चिलीम तंबाकू पुरवून धुनीला सर्पणहि देत असे आणि जरूर

पडल्यास पैसेहि देत असे आणि पुढें पुढें आपली सर्व कमाई (थैली) बाबापुढें ठेवित असे आणि बाबांनीं इच्छेस येईल तितके पैसे घ्यावे अशी विनंति करीत असे, पण बाबा पैसा दोन पैसे इतकेच घेत. बाबांनीं कमी पैसे घेतले किंवा कांहीं न घेतले तर काशीरामाला फार वाईट वाटे. अशा तऱ्हेची भावना उत्पन्न होणें किंवा बाळगणें हे आपल्या अध्यात्मक उन्नतीला बाधक आहे या तत्त्वानुसार काशीरामाची पैशासंबंधी ओढाताण होऊं लागली आणि याचवेळीं बाबांनी त्याचेपाशीं पैसे मागण्याचा सपाटा चालविला. त्यायोगें काशीरामाचा (पैसे देण्याचा) अभिमान दूर झाला आणि त्यांची सर्व (प्रापंचिक व पारमार्थिक) स्थिति सुधारली.

एकदां काशीरामावर भयंकर प्रसंग गुदरला. नाऊरच्या बाजारांतून घोड्यावर सामानासह परत येत असतांना वाटेंत लुटारु भिल्लांनीं त्यांचेवर हल्ला केला. लुटारु भिल्ल पुष्कळ असून शस्त्रधारी होते. त्यांनीं काशीरामावर हल्ला केला. त्यांचीच एक पडलेली तलवार घेऊन त्यानें प्रतिकार केला, पण एका भिल्लानें मागाहून येऊन डोक्यावर कुऱ्हाडीचा घाव घातल्यामुळें तो बेशुद्ध पडला. काशीराम मेला असें समजून तेथेंच त्याला टाकून चोर पळून गेले. पुढें कांहीं वेळानें काशीराम शुद्धीवर आला आणि कांहीं दिवसांनीं बरा झाला. बाबावर त्याची श्रद्धा असल्यामुळें इस्पितळांत जाण्याचें त्यानें नाकारलें आणि त्याच्या आग्रहाप्रमाणें त्याला शिरडीस आणलें आणि बाबांच्या सांगण्याप्रमाणें माधवराव देशपांडे यांचेकडून औषधोपचार करून घेऊन त्याची प्रकृति चांगली झाली. या शूर कृत्याबद्दल काशिरामाला मुंबईस सरकारकडून एक तरवार बक्षीस मिळाली. काशीरामाची भिल्लाशीं झटपट चालली असतां इकडे बाबानीं शिरडीला मशीदींत आकांत करून सोडला. शिव्या गाळी, बोंब वगैरे अनेक क्षोभाचे प्रकार केले आणि अशा विचित्र प्रकारांनीं भक्ताचें संरक्षण केलें. काशीराम हा शके १८३० ला वारला.

**बाबाच्या पूर्वाश्रमीची हकीकत**—बाबा हे मुळचे कोठील रहाणारे आणि त्यांचे आईबाप कोण होते, याविषयीं विश्वसनीय हकीकत कोणीच सांगू शकत नाहींत. बाबानीं स्वतःहि त्याविषयीं कोणाला कांहीं सांगितलें असेंहि दिसत नाहीं. यामुळें निरानिराळे लोक निरानिराळ्या कल्पना करितात, पण अद्याप निश्चयात्मक अशी हकीगत कळली नाहीं. म्हाळसापति हे बाबाचे अति निकटवर्ति भक्त. बाबा प्रथम एकटेच मशिदींत झोंपत असत, पण पुढें कांहीं दिवसांनीं म्हाळसापति आणि तात्या पाटील हे मशिदींत बाबांच्या सोबतीस झोंपण्यास जाऊं लागले. एक दिवस मशिदींत, दुसऱ्या दिवशीं चावडींतः असा बाबांचा निजण्याच्या क्रम होता. मशिदींत तिघांच्या गप्पागोष्टी वगैरे बराच वेळ चालत. या प्रमाणें ३०—४० वर्षे बाबांच्या समाधिपर्यंत म्हाळसपतीचा क्रम अव्याहतपणें चालला. यामुळें म्हाळसापति असें म्हणत असत कीं, महाराजांनीं (बाबांनीं) आपल्याला स्पष्ट सांगितलें कीं, मी पाथरीचा ब्राह्मण असून, लहानपणीं माझ्या आईबापांनीं मला एका फकीराला

देऊन टाकिलें होतें. ही हकीगत महाराजांनीं म्हाळसापतीस सांगितली. त्याच सुमारास पाथरीचा एक गृहस्थ कोल्हाळ्यास कांहीं कामासाठीं गेला होता व तो परत जातांना शिर्डीस आला. त्यावेळीं महाराजांनीं त्याच्याजवळ पाथरी येथील बऱ्याचशा मंडळींची नांवें घेऊन चौकशी केली. वर्ष (पहा, स्फुटविषय श्रीसाईलीला, १ लें पान १७९)

**बाबांच्या गुरुरायाची समाधि**—साठे—नवलकर वाड्याच्या जागेंत लिंबाचें झाड आहे, त्या झाडाखालीं कांहीं दिवस बाबा रहात आणि कांहीं दिवस ते मशिदींत रहात. असे होतां होतां एकेदिवशीं बाबा गांवांतील लोकांना म्हणाले कीं, तुम्हीं या ठिकाणीं खणा तेथें माझ्या गुरुची समाधि आहे. त्याप्रमाणें लोकांनीं उकरून पाहिलें, तों खरोखरच समाधि दिसली. तेव्हां लोकांनीं ती जागा साफसूफ करून त्या समाधीवर गलेफ व फुलें घालून पूजा केली. तेव्हांपासून तेथें दर गुरुवारीं लहानशी जत्रा भरत असते.

**फकीर जव्हारअल्लीची जबरदस्ती**—शिरडींत एक तांबोळी मोहिद्दीन भाई होता. त्याची बाबांशीं कांहीं बाबतींत तेढ पडून झोंबाझोंबी झाली. दोघेहि कुशल पहिलवान होते, पण त्यांत मोहिद्दीनची सरशी झाली. तेव्हांपासून बाबांनीं आपला सर्व बेत, कार्यक्रम, पोषाक बदलला. कफनी ओढली, लंगोट लाविला, माथ्यास फडका गुंडाळिला, गोणाचें आसन व गोणाचें पांघरूण केलें. फाटकें तुटकें परिधान करून त्यांतच ते समाधान मानूं लागले. "गरीबी अव्वल बादशाही! अमीरीसे लाख सवाई। गरीबोंका अल्ला। भाई। अक्षयीं साई वदत कीं (श्रीसाई सच्चरित्र अ. ५-६७) यानंतर सुमारें पांच वर्षांनीं अहमदनगरचा एक जव्हरअल्ली नांवाचा मृदुभाषी, कुराणशरीफ–प्रवीण फकीर शिरडीस आला आणि बाबांना आपला शिष्य म्हणूं लागला. रगेल स्वभावाच्या बाबांनीं तें मान्य केलें आणि गुरुशिष्य–दोघे राहत्यास राहूं लागले. गुरु नेणे शिष्याची कळा। शिष्य जाणे गुरुच्या अवकळा॥ परी न केव्हांहि अनादर केला। स्वधर्म राखिला शिष्याचा॥ (अ. ५. १२६) बाबांच्या मित्रमंडळीना आणि इतर लोकांना हे आवडेना. तेव्हां ते राहत्यास गेले आणि बाबांना त्यांनीं शिरडीस आणले. गुरु जव्हारअल्लीहि आले आणि तेथें कांहीं दिवस राहिले. पुढें एके दिवशीं देविदास आणि जव्हारअल्ली यांच्यामधें वादविवाद झाला आणि त्यांत जव्हारअल्ली पराभूत झाले आणि शिरडी सोडून ते निघून गेले.

**बाबांचें निवासस्थान आणि इतर ठिकाणीं गमन**—बाबा नेहमीं शिरडीस राहत असत, पण कधीं कधीं ते राहत्यास, निघोजास आणि निमगांवास जात असत. निमगांव येथें डेंगळे यांच्या घरीं बाबांची नेहमी बैठक असे व राहते येथें खुशालशेट यांच्या घरीं आणि तेथील कांहीं सावकाराच्या घरीं सहज लहरीनें जात. शिरडीच्या उत्तर बाजूला गांवापासून सुमारें तीन नंबरावर एक ओढा आहे. त्याचें नांव **सीव**. त्या ओढ्यावर बाबा स्वतः बसत असत आणि केव्हां केव्हां त्या ओढ्यांत एक पुरुषभर खड्डा खणीत व त्यांत स्वतः उभे राहून आपलें

शीर तेवढें वर उघडें ठेवून वाळू टाकून स्वतःस पुरून घेत असत.

**बाबांची वैद्यकी**—बाबा शिरडी मुक्कामीं लोकांना औषधपाणी देत व त्याच्या योगानें मोठेमोठे रोग बरे क़रीत असत. आजार पाहून दवा देत आणि त्यांच्या हाताला यश खात्रीनें येत असे. त्यांची औषधें देण्याची तऱ्हाहि विचित्र असे. उदाहरणार्थ, एक केस येथें देतों. एकदां एका भक्ताचे डोळे सुजून लाल गोळे झाले. शिरडींत त्याला वैद्य मिळाला नाहीं. भाविक भक्तांनीं बाबांस ते डोळे दाखविले. बाबाचा उपायच न्यारा. बिबे ठेचून बाबानी गोळे तयार केले आणि दोन्हीं डोळ्यांत ते गच्च भरून वरून फडकें गुंडाळिलें. दुसरे दिवशीं पट्टी सोडून डोळ्यांवर पाण्याची संतत धार धरिली, त्यायोगें सूज सर्व निवळली आणि बुब्बुळें निर्मळ स्वच्छ झालीं. अशा तऱ्हेचे अनेक अनुभव लोकांना आले आणि ते विख्यात हकीम झाले. पुढें त्यांनीं दवा देण्याचें बंद करून धुनींतिल उदीनेंच भक्तांच्या आधिव्याधि दूर करण्याचें सुरू केलें. या पूर्वी कांहीं दिवस ते वेड्यासारखे वागूं लागले आणि वाटेल त्या ठिकाणीं बसू उठूं लागले. या त्यांच्या वागण्यावरून लोक त्याना वेडा फकीर असें मानूं लागले पण ही त्यांची भावना लवकरच अनुभवानें नष्ट झाली.

**बाबांची अलौकिक शय्या**—मशिदीतील जमीन नादुरुस्त असल्यामुळें, नानासाहेब डेंगळे यांनीं अजमासे चार हात लांब एक हात रुंद अशी फळी निजण्यासाठीं आणून दिली. ती जमिनीवर न ठेवतां आणि वापरतां, चिंध्यांचे काकडे वळून त्यांनीं ती आढ्यास टांगून ठेविली. त्या चिंध्या हलक्या व जीर्ण असल्यामुळें बाबांचें वजन तर सोडाच, पण नुसत्या फळीचें वजन त्या कशा धारण करतील हा मोठा प्रश्नच होता, पण आश्चर्य हे कीं त्या फळीच्या चारी कोपऱ्याला पणत्या पेटत ठेवून बाबा तिच्यावर सुखानें झोंपत असत. पण ते कसे व केव्हां वर चढत व उतरत असत हे प्रयत्न करूनहि कोणी पाहूं शकला नाहीं. जेव्हां लोकांची याविषयीं जिज्ञासा अधिक वाढूं लागली, तेव्हां बाबांनीं या फळीचे तुकडे करून फेंकून दिले. तसेंच पणत्यांतील तेल बाबा वाण्यांकडून मागून आणत असत. एकदां वाण्यानें तेल देण्याचें नाकारलें, तेव्हां बाबांनीं पणत्यांत पाणी घालून त्या पाण्यानेंच त्या पणत्या रात्रभर पेटत ठेविल्या. अणिमा, गरीमा इत्यादि सिद्धी त्यांना प्राप्त झाल्या होत्या हें यावरून सिद्ध होतें; पण बाबांनीं त्या सिद्धीची कधींच परवा केली नाहीं.

**मशीद**: प्रथम बाबांना राहण्याकरितां नियोजिलेली मशीद फार जुनी व जीर्ण होती. ती नवीन बांधावी असें श्री. नाना-

• धैर्य, धर्म, मित्र आणि भार्या या चौघांची परीक्षा संकटकालीं होत असते.

साहेब चांदोरकरांच्या मनांत होतें. पण म्हाळसापतीला विचारून मशीद दुरुस्त करून घेण्यास बाबांनीं परवानगी दिली. तेव्हां श्री. नानासाहेबांनीं तिचा जीर्णोद्धार करून ती राहण्याजोगी दुरुस्त करून घेतली.

**बाबांची पूजा :** म्हाळसापति बाबांची पूजा करीत होते, पण बाबांच्या कपाळाला गंध लावीत नव्हते. नंतर बाबांनीं त्यांना असा दृष्टांत दिला कीं, बाबांच्या कपाळास गंध आणि दोन्ही हातांना उटण लावलेले असे बाबा त्यांना दिसले. लागलीच म्हाळसापति दुसऱ्या दिवसापासून नित्या-प्रमाणें देवाची पूजा करून, बाबांची पूजा करून त्यांच्या कपाळास गंध लावूं लागले आणि बाबाहि कपाळास गंध लावून घेऊं लागले. पण ही कपाळास गंध लावण्याची तऱ्हा किंवा चाल मुसलमान लोकांना आवडेना आणि त्यांनीं तसें बाबांना सांगितल, पण बाबांनीं त्यांचे ऐकिलें नाहीं. तेव्हां त्यांनीं संगमनेरच्या काजीला बोलावून आणिलें आणि म्हाळ-सापतीच्या सगंध पूजेला हरकत आणण्याचा त्यानीं बेत केला. तो म्हाळसापतीला समजला. तेव्हां ते घाबरून, नित्याप्रमाणें खंडोबा, शनि, गणपति आणि मारुती या देवतांची पूजा करून बाबांची पूजा न करितां मशिदीवरून जाऊं लागले, तेव्हां बाबांनीं त्यांना हट-कलें आणि विचारलें कीं, आज तूं सगंध पूजा न करितां असा बाहेरून कां चाललास? ‘काजीसाहेब रागावतील म्हणून मी बाहेरून चाललों,’ असें त्यांनीं सांगितले. “लगाव हे संदल, ह्यां लगाव, ह्या लगांव (कपाळास मस्तकास, गळ्याला व हाताला), भंडार व चंदनकु कोन नाम रखेंगा (भंडार व चंदन याला कोण नांव ठेवूं शकणार?) असा बाबांनीं धीर दिल्यावर म्हाळसापतीनीं बाबांची पूजा केली. काजीसाहेब मुकाट्यानें परत गेले. तेव्हांपासून बाबाची संगध पूजा दररोज होऊं लागली. त्यानंतर श्री. सीताराम डेंगळें आणि श्री हरि विनायक साठेचा ब्राह्मण मेघा हेहि बाबाची पूजा करूं लागले. पण म्हाळसा-पतीची पूजा बाबांच्या महासमाधीपर्यंत एकसारखी चालू होती. श्री. साठे साहे-बांचा नैवेद्य आणि बाबाच्या आज्ञेप्रमाणें बंधुसमान मानिलेल्या श्री. बाळासाहेब भाट्याचा नैवेद्य, म्हाळसापति रोज मशी-दींत बाबांकडे घेऊन जात असत.

**जेजुरीच्या यात्रेंत बाबांची मदत:** म्हाळसापति दरवर्षीं खंडोबाची पालखी नेऊन जेजुरीची वारी करीत. एका खेपेस जेजुरींत प्लेगचा उपद्रव सुरू आहे असें समजल्यामुळें म्हाळसापति आणि मंडळी फार घाबरली. म्हाळसापति चिंतातुर व उदास होऊन पालखीला टेंकून बसले; तेव्हां पाठीमागें कोणी आल्याचा भास झाला. म्हाळसापतीनें वळून पाहिलें तों त्यांना बाबा दिसले व ताबडतोब गुप्त झाले. त्यामुळें त्यांना धीर आला आणि त्यांनीं बाबांच्या दर्श-नाची गोष्ट मंडळींना सांगितली. तेव्हां त्यांनीं आणि सर्व मंडळींनीं खंडोबाचा आणि बाबांचा घोष चालविला. त्यांच्या चार दिवसांच्या मुक्कामांत त्यांना यत्किंचितहि त्रास झाला नाहीं आणि त्यांची यात्रा निर्विघ्नपणें पार पडली. शिरडीस परत आल्यावर बाबा

म्हणाले–' काय म्हाळसापति, जत्रा चांगली झाली ना! मी पण तेथें आलों होतों, तुम्हीं नव्हतां का पालखीला पाठ लावून बसलां? त्यावेळींच मी तेथें आलों.' हे ऐकून म्हाळसापतीला फार आनंद झाला. तसेंच इतर वाऱ्यांच्या प्रसंगीं, पाण्याचा शोध लावून देणें, बरोबर वाट दाखविणें मंडळीकरितां पारनेर पोलिसां-कडून पास मिळवून देणें, इत्यादि गोष्टींत बाबाची लीला म्हाळसापति आणि मंडळी यांना दिसून आली आणि आश्चर्यकारक रीतीनें योग्य आणि जरूर मदत मिळाली.

**म्हाळसापतीच्या कुटुंबाच्या गळ्याची गोळी (गळूं)**–म्हाळसा-पतीचें कुटुंब माहेरीं दूर गांवा होतें. तिच्या गळ्याला गोळा (गळूं) आला होता हें कोणास माहीत नव्हतें. एके दिवशीं बोलतां बोलतां बाबा म्हणाले—तुझ्या बायकोच्या गळ्याला गळूं आलें आहे आणि त्यामुळें तिला फार त्रास होत आहे. तें गळू मीच नीट करीन आणि दुसरा कोणी करणार नाहीं. पुढें तिचें माहेराहून पत्र आलें. त्यांत गळू झाल्याचा आणि तें बरें झाल्याचा मजकूर होता.

**म्हाळसापतीचा अपमान व बाबांचें भविष्य**–बाबांनीं म्हाळसापतीस सांगितलें कीं, कोपरगांव तालुक्यांतील आस्तगांवला श्री. रामभाऊ लोंढे यांचेकडे आणि डोऱ्हाळ्यास मुलीकडे, तूं जाऊं नकोस, गेलास तर तुझा अपमान होईल. म्हाळसापतीस या ठिकाणीं जावें लागलें आणि बाबांच्या भविष्याप्रमाणें त्यांचा तेथें अपमान झाला.

**म्हाळसापति आणि सडकी कुत्री**–एकदां म्हाळसापतीच्या घरीं त्यांच्या वडिलांच्या पुण्यतिथीच्या दिवशीं कांहीं मंडळी जेवावयास बसली. तोंच तेथें एक रोगानें सडलेली एक कुत्री आली; नेहमींच्या पद्धतीप्रमाणें तिला पोळीचा तुकडा टाक म्हणून म्हाळसापतीनें आपल्या पत्नीला सांगितलें. पण तुकडा न मिळाल्या-मुळें ती कुत्री तशीच उभी राहिली, तेव्हां म्हाळसापतीनें तिला एक टोला लगावला, त्याबरोबर ती पळून गेली. नंतर सायं-काळीं बाबांचा बिछाना घालतेवेळीं बाबा म्हाळसापतीला म्हणाले, 'का रे म्हाळसापति, गांवांत माझ्यासारखी एक सडकी कुत्री हिंडते, तिला कोणीहि मारतात,' हे ऐकून म्हाळसापतीला दुपा-रची आठवण होऊन झालेल्या चुकीची त्यांनी माफी मागितली आणि बाबांच्या पायावर आपलें मस्तक ठेविलें.

**बाबांची अगाध लीला आणि म्हाळसापतीची परीक्षा:** बाबांच्या महासमाधी (१९१८) पूर्वीं सुमारें ३२ वर्षें म्हणजे १८८६ सालीं बाबांनी सीमोल्लंघन करण्याचा प्रयत्न केला. मार्गशीर्ष पौर्णिमेच्या दिवशीं त्यांना दम्याचा भयंकर झटका आला. तो निवारण्यासाठीं त्यांनीं ब्रह्मांडी प्राण चढवून समाधि लावण्याचा प्रयत्न केला. त्यांनीं सर्वांना सांगितल का आजपासून तीन दिवस मला जागें करूं नका आणि मी न उठलों तर, त्या जागी (सभा-मंडपाच्या कोपऱ्याकडे ठिकाण दाखवून) समाधि खोदून मला ठेवून द्या. म्हाळसापती-कडे वळून त्याला त्यांनीं निक्षून सांगितलें कीं, तीन दिवस माझी उपेक्षा करूं नकोस.

यानंतर हल्लीं ज्या ठिकाणीं जातें आहे, त्या ठिकाणीं बाबा रात्रौ १० च्या सुमारास अचेतन होऊन म्हाळसापतीच्या मांडीवर पडलें. श्वास आणि नाडी बंद झाली. सर्वांनी बाबांची आशा सोडली. पाटील कुलकर्ण्यांनी पंचनामा केला आणि लोक समाधि देण्याच्या तयारीस लागले; पण म्हाळसापतींनें आशा सोडली नाहीं, 'मग पुढें म्हाळसापती । अहोरात्र सावधवृत्ती । साईबाबांलागी जपती । तैसेच बैसती जागत ॥" (श्री साईसच्चरित अ. ४४. ७२ ) पुढें तीन दिवसांनीं पहांटे तीन वाजतां चेतना येऊं लागली, श्वासोच्छ्वास सुरू झाला, डोळे उघडले, पोट हालूं लागलें, शरीराला आळेपिळे दिले गेले, आणि बाबा पूर्ववत् सचेतन झाले आणि सर्व भक्त आश्चर्यचकित आणि प्रसन्नवदन झाले. थोडक्यांत सांगावयाचें म्हणजे, भगत् म्हाळसापती आज्ञापालनीं चुकला असता तर फार मोठा कठीण प्रसंग ओढवला असता.

"लोकोपकार हेंचि कारण । करूनि समाधींचें विसर्जन ॥ साई पावते झाले उत्थान । समाधान भक्तजनां ॥" (श्री साईसच्चरित अ. ४४–९१ )

धन्य श्री साईबाबा आणि धन्य त्यांचा निस्सीम, निकटवर्ति, अनन्य आणि विरक्त भगत् म्हाळसापति !

**ॐ नमो भगवते श्रीसाई रमणाय ।**



● या जगांत तीन प्रकारचे पुरुष असतात. गुलाबासारखे, आम्रवृक्षासारखे आणि फणसासारखे. एकास नुसतीं फुलेंच येतात तर दुसऱ्याला फळें व फुलें येतात व तिसऱ्यास केवळ फळेंच लागतात. त्याचप्रमाणें पुरुषांत देखील एखादा नुसता बोलतोच, करीत नाहीं. दुसरा बोलतो व तसें करतोही आणि तिसरा अक्षर देखील न बोलतां केवळ करणीच करून दाखवितो.

विसंवाद तत्वप्रणालीच्या संघर्षानें आज सर्व जगाचा संहार होऊं पहात आहे. अशा आणीबाणीच्या प्रसंगीं धार्मिक संस्थांनीं आपल्या नित्य वहिवाटीच्या भजन कीर्तनादि प्रकारांना नवें वळण देणें जरूर आहे. व्यष्टि समष्टीच्या दैनंदिन चिंता दूर करून ' माझेनि नामघोषें । नाहींचि करिती विश्वाची दु:खें ' अशा उदात्त अंत:करणानें आपल्या भजन कीर्तनांत विश्व–शांतीचें नादब्रह्म यांनीं नाचविलें पाहिजे.

★

# ज्ञानेश्वरींतील पसायदान

★

लेखक—**वाङ्मय प्रभू खंडेराव सदाशिव त्रिलोकेकर**

ज्ञानेश्वरींतील पसायदान अत्यंत मार्मिक व उद्बोधक आहे. हें पसायदान सर्व भक्तिसांप्रदायी संस्थांना आदर्शवत असें आहे. ह्या पसायदानांत मराठी अंत:करणाच्या माणसांचें ध्येय किती उदात्त आणि व्यापक असते याची साक्ष आहे, "हें विश्वची माझें घर" ह्या भक्तीच्या पायावर उभारलेल्या विश्वबंधुत्वाचें द्योतक आहे:

हें पसायदान म्हणजे भक्तिरूपी सुवर्णाचें नाणें अखंड व्यवहारांत चालू ठेवण्याचा संकल्प आहे. ह्या पसायदानाच्या प्रार्थनेंतील पहिल्या ४ ओव्या अत्यंत बहारीच्या आहेत. ' आतां विश्वात्मकें देवें । येणें वाग्यज्ञें तोषावें । तोषोनी मज द्यावें पसायदान हे ॥ १ ॥ जे खळांची व्यंकटी सांडो । तयां सत्कर्मी रती वाढो । भूतां परस्पर जडो मैत्र जीवांचे ॥ २ ॥ चला कल्पतरूंचे अरव । चेतना चिंतामणीचे गांव । किंबहुना जे अर्णव । पीयुषांचे ॥ ३ ॥ चंद्रमें जे अलांछन । मार्तंड जे तापहीन । ते सर्वांही सदा सज्जन । सोयरे होतु ॥ ४ ॥

ज्ञानेश्वर महाराजांनी ज्या उदात्त हेतूनें ज्ञानेश्वरी लिहिली त्या उदात्त हेतूला साजेसेच असें हें पसायदान आहे.

श्री ज्ञानेश्वर महाराजांनी दोन संकल्पांनीं हातांत लेखणी धरिली होती. पहिला संकल्प कुळंबटांच्या मराठी भाषेला सनागर करणें हा होय. आणि दुसरा, मराठींत अभिजात असा धर्मग्रंथ रचून सर्व वर्णांच्या लोकांना धार्मिक भांडार खुलें

करून धार्मिक बाबतींतील समाजांतील विषमता व अन्याय दूर करणें. हे दोन्ही संकल्प त्यांनी परिपूर्ण केले. श्री. ज्ञानेश्वरांचा ग्रंथ रचनेचा सर्वच थाट अगदींच अभिनव. श्री शंकराचार्य, श्री रामानुज आणि वामन पंडीत ह्यांच्या गीतेवरील टीकेंतील मंगलाचरण वाचल्याबरोबर आतां पुढें लेखक कोणत्या वळणावर जाणार ह्याची अटकळ करतां येतें. ज्ञानेश्वरीचें मंगलाचरण पाहिलें तर आत्मरूप श्री गणेशाचे वाङ्मयीन रूपक आणि तें संपताक्षणींच "आतां अभिनव वाग्विलासिनी। जे चातुर्यार्थ कला कामिनी। ते शारदा विश्वमोहिनी। नमिली मियां॥ अशी शारदेची प्रार्थना. ज्ञानेश्वरींतील आध्यात्मिक प्रमेयांची विवरणें अगदीं सरळ. कुणाशीही वाद नाहीं. कर्णकटू अशा घटपटादि खटपटीचा मुळींच गलबला नाहीं. मधून मधून "माझा मऱ्हाटाचि बोल कौतुकें। अमृतातें हीं पैजा जिंकें।", "देशियेचेनि नागरपणें। शांतु शृंगारातें जिणें। तरी चोविया होती लेणें।, साहित्यासी", "तैसी देशी आणि संस्कृत वाणी। एका भावार्थाच्या सुखासनीं। शोभती आयणी। चोखट आईका॥", "उठावलिया भावारूप। करितां रसवृत्तीचें लागे वडप। चातुर्य म्हणे पडप। जोडलें आम्हां॥", "तैसें देशियेचें लावण्य। हिरोनि आणिलें तारुण्य। मग रचिलें अगण्य॥ गीतातत्व॥" ह्या भाषाभिमानाच्या लाटा आध्यात्मिक विवरणाचे बांधारें उल्लंघून उसळून वर येतच आहेत.

ज्ञानेश्वरींतील ह्या अनन्य साहित्य सौंदर्यामुळेंच 'नटकृत तांडव विकटा पंडित टीका स्फुरंति गीतायां रंभालास्य विलासा जयति ज्ञानेश्वरी तासु' असा अभिप्राय रसिकांनीं धन्यपणें दिला आहे.

कोणताहि आणि कितीहि प्रतिभासंपन्न लेखक असला तरी त्याच्या स्फूर्तीला कांहीं तरी सीमा ही असतेच. कितीहि उत्कृष्ट ग्रंथ घेतला तरी त्या ग्रंथाच्या शेवटीं लेखकाची स्फूर्ति ओसरत चालली आहे याचा अनुभव रसिकांना येतोच. परंतु श्री ज्ञानेश्वरीच्या बाबतींत मात्र सर्व कांहीं निराळाच थाट दिसतो. अठराव्या अध्यायांतील टीका पूर्ण होऊन गुरुजन आणि संतांचे आभार मानल्यानंतर वास्तविक पाहिलें तर ज्ञानेश्वरीचें लेखन पूर्ण व्हावयास पाहिजे होतें. परंतु ज्ञानेश्वरींतील स्फूर्तीचा अमोघ प्रवाह चालूच आहे. त्या स्फूर्तीला उसंतच नाहीं. श्री ज्ञानेश्वरांसमोर बसलेले सर्व संत आतां ज्ञानेश्वरांचें प्रवचन संपलें म्हणून उठण्याचा विचार करीत आहेत तोंच ज्ञानेश्वरांनी पसायदानाला प्रारंभ केला. "चहूं पुरुषार्थां शिरी। भक्ति जैसी" ह्या ज्ञानेश्वरींतील भक्तीच्या महतीनें सारे श्रोते, संत व भक्त तल्लीन आणि तन्मय झाले होते. ज्ञानेश्वरांनी पसायदान सुरूं केलें. भक्त विस्मयानें आणि कौतुकानें तटस्थपणें ऐकत राहिले. ते मंत्रमुग्ध झालें ह्यांत नवल कसलें! ज्ञानेश्वरींतील प्रतिभा, प्रसाद, लालित्यादि गुणांनीं अगदी अखेरपर्यंत उचंबळून वहाणारी स्फूर्ती ह्याला जागतिक वाङ्मयांत जोड नाहीं. ज्ञानेश्वरींतील पसायदानांत भक्तीचें रहस्य सांठवलेलें आहे. हें पसायदान म्हणजे भक्तीचें शिखर. बोलून चालून श्री ज्ञानेश्वर म्हणजे शब्दसृष्टीचे

राजराजेश्वर. ज्ञानेश्वरींतील ४ थ्या अध्यायाच्या समारोपांत सांगितल्या प्रमाणें " हे परिसा मऱ्हाटे बोल। जे समुद्राहुनि सखोल अर्थ भरित ॥ जैसें बिंब जरी बचकेचि एवढें। परि प्रकाशासि त्रैलेक्य थोकडें। शब्दाची व्याप्ति तेणें पाडे। अनुभवावी " असें ज्यानें मराठी भाषेवर प्रभुत्व त्या श्री ज्ञानेश्वरांच्या ज्ञानेश्वरीतील पसायदानांतील उदात्तता, प्रतिभासंपन्नता आणि माधुर्यता अवीट आहे. छे, श्री ज्ञानेश्वरांच्या शब्दांत बोलायचें म्हणजे त्या पसायदानाची रुचि व महती नित्य नवी अशीच आहे.

आज सर्व संतपूजन, कीर्तन, भजनादि कार्यास वाहून घेतलेल्या सर्व धार्मिक संस्थाना त्या पसायदानांत एक एक पवित्र असा संदेश दिलेला आहे ह्यांत संशय नाहीं. केवळ स्वतःच्या उद्धारासाठीं धडपडणारी भक्ति ही कनिष्ट भक्ति होय. हें भक्तिचें वैयक्तिक आकुंचित क्षेत्र होय. पण ज्या भक्तीला भक्त मोठ्या अभिमानानें पंचम पुरुषार्थ म्हणून मानतात अशा भक्तांची तळमळ अहोरात्र सबंध विश्वाच्या उद्धारासाठीं प्रयत्न करीत असते. ही भक्ति म्हणजे प्रचंड शक्ति; ही निर्व्याज प्रेमाची प्रशांत देवता आहे. नारदीय भक्ति सूत्रांत 'कस्तरति कस्तरति माम्' ह्याचें उत्तर 'यो महानुभावं सेवते' असें म्हटलें आहे. हे महानुभावी कोण आणि त्यांचा महानुभाव कोणता हें पसायदानाच्या "चला कल्पतरूंचे अरव। चेतना चिंतामणीचे गांव" ह्या शब्दप्रबंधांत समर्पकपणें सांगितलें आहे. खुद्द नारद महर्षिही म्हणतात कीं " स तरति स तरति स लोकांस्तारयति " असे भक्त स्वतः तरतात यांत काय नवल परंतु सर्व लोकांचें तारण करतात; अशा महानुभाव भक्तांची जगाला आज अत्यंत जरूरी आहे. विसंवादी तत्वप्रणालीच्या संघर्षानें आज सर्व जगाचा संहार होऊं पहात आहे. अशा आणीबाणीच्या प्रसंगीं धार्मिक संस्थांनी आपल्या नित्य वहिवाटीच्या भजन कीर्तनादि प्रकारांना नवें वळण देणें जरूर आहे. व्यष्टि समष्टीच्या दैनंदीन चिंता दूर करून 'माझेनि नामघोषें। नाहींचि करिती विश्वाची दुःखें' अशा उदात्त अंतःकरणानें आपल्या भजन कीर्तनांत विश्व–शांतीचें नादब्रह्म त्यांनीं नाचविलें पाहिजे.

विशेषतः ज्या भक्तिसांप्रदाय संस्था प्रौढ आणि संपन्न आहेत त्यांनीं स्वामी रामकृष्ण मिशन सारख्या संस्थेचे आदर्श पुढें ठेवून आपल्या कार्याला नवीन वळण दिले तर अशा नवीन प्रयोगांतूनही त्या त्या संस्थेच्या भक्तवृंदांतून एखादे स्वामी विवेकानंद किंवा एखादे रामतीर्थ प्रकट होऊन विश्वाचें मार्गदर्शन करून भयभीतांना आश्वासन देऊन भक्ति हा खरोखरीच पंचम पुरुषार्थ आहे हे स्वतः सिद्ध करतील.

श्री साईबाबांची सुद्धां हीच शिकवणूक होती. वाड्यांत श्री काकासाहेब दिक्षित, श्री देव वगैरे सारख्या भगवतांकडून एकनाथी भागवत, रामयण व ज्ञानेश्वरी सारख्या धार्मिक ग्रंथांचे प्रवचन सारखे चालू ठेवीत व आपल्या दर्शनास येणाऱ्या भक्तांना तें ऐकण्यास मुद्दाम आठवणीनें पाठवीत असत. यांत त्यांचा एवढाच उद्देश होता कीं ह्या भूमींतून 'चला कल्पतरूंचे अरव, चेतना चिंतामणीचे गांव' अशा विभूती अवतरून साई सांप्रदायांत अभिप्रेत असे विश्व कल्याणाचे पवित्र कार्य सिद्धीस जावो.

---

जसें आत्मज्ञान आम्हांला साहाय्यक आहे तसें सृष्टीचें विज्ञानहि आहे. ज्ञान आणि विज्ञान दोहोंचीहि आवश्यकता आहे. पक्षी दोन्हीं पंखांनीं उडत असतो. मानव जीवनाचे हे दोन पंख आहेत.

# आचार्य विनोबाजींची अमृतवाणी

सृष्टीला संख्येचा भार होत नाहीं, पापाचा भार होतो. पापामुळें प्रजा वाढली तर भार अवश्य होईल. प्रजा पापानें वाढूं शकते व पुण्यानेंहि वाढूं शकते. ती पापानेंहि घटूं शकते व पुण्यानेंहि घटूं शकते. प्रजा वाढो कीं घटो, पुण्य असेल तर भार होणार नाहीं, पाप असेल तर भार होईल, हानि होईल. ब्रह्मचार्यानें प्रजा घटली तर लाभ होईल. पौरुषहीनतेनें घटली तर हानि होईल; संयमानें घटली तर लाभ, कृत्रिम उपायांनीं घटली तर हानि, पुण्यानें वाढली तर लाभ, स्वैराचारानें वाढली तर हानि. माझा असा सिद्धान्त आहे कीं सृष्टीमध्यें जेवढे प्राणी व जंतू आले आहेत त्यांच्या पोषणाची व्यवस्था सृष्टीमध्यें आहेच. परंतु सृष्टीच्या सेवेसाठीं-परमेश्वरानें आम्हांला जे दोन हात दिले आहेत त्यांचा पूर्ण उपयोग मात्र आपण करायला हवा.

## अनीतिमय उपाय

आजकाल कृत्रिमरीतीनें कुटुंबनियोजन करण्याच्या गोष्टी केल्या जात आहेत. लोक या गोष्टीचा विचार करीत नाहींत कीं, त्यामुळें अनीतीचा किती प्रचार होईल, आत्मसंयमनांच्या शक्तीचा किती ऱ्हास होईल, संपूर्ण जीवन किती पराक्रमशून्य होईल! या सर्व लोकांचा एक ऋषि होऊन गेला त्याचें नांव 'मालथस.' त्याचा असा सिद्धान्त आहे कीं, प्रजा किंवा संतान जास्त वाढल्यास जमीन त्यांचें पोषण करूं शकणार नाहीं. अहो, मग ॲटम् व हायड्रोजन बॉंब तयार होऊं लागले म्हणून आरडाओरड कां करतां? छानच झालें, तेवढेच लोक मरतील! थोडे लोक शिल्लक राहतील म्हणून मग दुःख कां करतां? आपणाला पराक्रमशील व्हायचें आहे, कर्मशील व्हायचें आहे, परिशोधक वृत्ति ठेवायची आहे. यासाठीं जर विज्ञान वाढविणें जरूर असेल तर अवश्य वाढवावें. सृष्टीमध्यें विज्ञान जितकें वाढेल तितकी सृष्टि अधिक उन्नत आणि समृद्ध होईल. म्हणून विज्ञानाचा खूप उत्कर्ष व्हावा अशी माझी इच्छा आहे.

कांहीं लोकांना वाटतें कीं विनोबाला विज्ञान नको, त्यांना फक्त चरख्याचा प्रचार करावयाचा आहे. पण ही समजूत

चुकीची आहे. मला चरखाहि हवा आहे. आणि विज्ञानहि हवें आहे. लोक म्हणतात, विमानाची गति खूप वाढली आहे, पांच तासांत दिल्लीला जातां येतें. मी असें विचारतों कीं तुमचें विज्ञान एवढ्या-वरच कां थांबतें ? विमानांत पांच पांच तास बसून कंटाळा येतो असें तुम्हीच म्हणतां, मग एवढी सुधारणा करा आणि अशी व्यवस्था करा कीं विमानांतसुद्धां व्यवस्थितपणें कांततां येईल. एवढें जर जमलें नाहीं तर विज्ञानाचा काय उपयोग !

## ज्ञान आणि विज्ञान

जसें आत्मज्ञान आम्हांला साहाय्यक आहे तसें सृष्टीचें विज्ञानहि आहे. ज्ञान आणि विज्ञान दोहोंचीहि आवश्यकता आहे. पक्षी दोन्हीं पंखांनीं उडत असतो. मानव जीवनाचें हे दोन पंख आहेत. मानव समाजाचं अगदीं प्रारंभापासूनच आत्म-ज्ञान आणि विज्ञान प्राप्त करण्यांची धड-पड चालू आहे. विज्ञान खूप वाढावें असें मला वाटतें. पण त्याबरोबरच माझी अशी इच्छा आहे कीं, त्यांचा सदुपयोग करण्याची अक्कल आमच्यामध्यें असावी अग्नीचा उपयोग स्वयंपाक करण्यासाठींच करायचा असतो, घरांना आगी लावण्या-साठीं नाहीं. विज्ञानाचा खूप विकास व्हावा व त्याचा सदुपयोग करण्याची शक्ति आमच्यामध्यें असावी अशी माझी इच्छा आहे. लोक म्हणतात कीं आतां ॲटमचें युग आलें आहे व त्याचा उपयोग लोक कल्याणकारी कामासाठीं होऊं शकतो. ॲटम युगांत खेड्यांचा कारभार कसा चालेल ? मी म्हणतों कीं या युगाचाहि स्वाद आपण चाखावा. अणुशक्तीचा उप-योग होऊं शकेल तितका करावा. अणु-शक्ति विकेंद्रित करून गांवोगांवीं तिचा उपयोग करण्यांत यावा. म्हणून विज्ञा-नाच्या शोधाबद्दल मला आदर आहे.

## विजेचा उपयोग


मी विजेचा उपयोग करायला तयार आहे; पण ती कशा तऱ्हेनें वापरावी हा मुद्दा महत्वाचा आहे. मूठभर लोकांच्या हातीं जर आपण ही शक्ति दिली तर ती शोषणाचें साधन बनेल. आज हेंच चालू आहे आणि यालाच माझा विरोध आहे. वीज पहिल्यानें कोठें येते ? मोठ्या शहरांत मग ती खेड्यापाड्यांत जाणार. दूरदूरच्या खेड्यांत तर ती जातच नाहीं. तिचा फायदा सर्वांना सारख्या प्रमाणांत मिळत नाहीं. तिचें भांडवल श्रीमंतापाशींच राहणार. गरीबांपाशीं नाहीं. म्हणून विजेची शक्ति गरीबांच्या उपयोगाची नाहीं. उलट ती त्यांचें शोषण करील. लोकांना निव्वळ उजेड देण्यासाठीं विजेचा उपयोग होईल तर त्याचा परिणाम एवढाच होईल कीं लोक रात्रीं जागरण करूं लागतील, त्यांचे डोळे बिघडतील आणि किडे त्यांना सताव-तील. गरीबांसाठीं विजेचा उपयोग जवळ जवळ शून्यच आहे. विजेची आवश्यक तीं साधनें जर सर्वांना दिलीं व तिचा उपयोग होऊं शकला तर तिचा लाभ सर्वांना मिळेल. एवढें करावयाला तुम्ही तयार असाल तर मी विजेचा उपयोग करावयाला तयार आहे. विज्ञानाचा अत्यंत उत्कर्ष व्हावा असें मी इच्छितों, कारण मी अहिंसावादी आहे, हिंसावादी नाहीं.

## हिंसा आणि विज्ञान

विज्ञानाचें लग्न जर हिंसेशीं लागेल तर मानवाचा सर्वनाश होईल; म्हणून विज्ञानाचें

लग्न अहिंसेशीं व्हायला हवें. विज्ञान आणि अहिंसा यांच्या संयोगानें पृथ्वीवर स्वर्ग अवतरेल. हिंसा आणि विज्ञान यांच्या संयोगानें मानवाचा संहार होईल. मानवानें उपयोगाचीं दुसरीं साधनें अवश्य बनविलीं पाहिजेत. परंतु विमान आलें तरी मी पायीं चालणें बंद करणार नाहीं. सर्वत्र पायीं फिरेन. लोकांनीं आजकाल पायीं चालणेंच बंद केलें आहे. आठ दहा मैल चालायचें असेल तर पायीं चालावें व खूप दूर जावयाचें असेल तर वाहानाचा उपयोग करावा. तुम्हांला वेळ वाचवायचा आहे कीं स्वतःला वांचवावयाचें आहे? हा माझा प्रश्न आहे. कांहीं लोक म्हणतात कीं, आम्हीं पायीं चालणारच नाहीं व मोटारनें प्रवास करून लवकर लवकर कामें उरकूं. पूर्वी ज्या कामाला पांच वर्षें लागत तें आम्हीं पांच मिनिटांत करूं. अशा लोकांना मी असें सांगू इच्छितों कीं ईश्वरानें जर तुम्हांला म्हटलें कीं मीसुद्धां तुम्हांला शंभरऐवजीं पन्नास वर्षांतच उचलून नेतों तर तें तुम्हांला आवडेल काय? जशास तसें हा ईश्वराचा न्याय आहे. म्हणून दीर्घायुषी बनायचें असेल तर रात्रीं सिनेमा पाहतां कामा नये, शाळेंत पायीं गेलें पाहिजे, कपडे धोब्याकडून धुऊन घेतां कामा नयेत आणि रात्रीं गाढ झोंप घेतली पाहिजे. विज्ञान तर वाढावेंच पण त्या बरोबरच अहिंसा व अक्कलसुद्धां वाढावी अशी माझी इच्छा आहे. अहिंसा आणि अक्कल मिळून आत्मज्ञान होतें. म्हणून आत्मज्ञानाबरोबर विज्ञान हवेंच.

———



● शठाशीं नम्रता, कुटिलाशीं प्रीति, निसर्गतःच कृपणाशीं सुंदर नीति, मायाबद्धाला ज्ञानबोध, अति लोभ्याला वैराग्योपदेश, क्रोध्याला शांतिकथन आणि कामीजनांना हरिकथा या गोष्टी म्हणजे खडकाळ जमिनींत बीजारोपण करून फलाकांक्षा करण्यासारख्याच होत.

कै. संतश्रेष्ठ गाडगे महाराज यांच्या
अमर जीवनांतील दोन—

# अविस्मरणीय स्मृतिचित्रें

१

शनिवार दिनांक २४–११–५६. रात्रींचे सव्वा दहा वाजले होते. बाबांची प्रकृति अजून फिरण्या–चालण्याइतकी सुधारलेली नव्हती. नामदार तपासे यांच्या बंगल्या-वरील एका खोलींत नामदार तपासे, सौ. बाईसाहेब व कांहीं सेवकांच्या सान्नि-ध्यांत श्री बाबा होते. बिछान्यावर बसल्या बसल्या समोर असलेल्या सर्व मंडळींना खालीं बसवून श्री बाबा म्हणाले, ‘ आजचा दिवस सुवर्णाचा वाटतो, म्हणून थोडे भजन करावे असें मनांत आहे. ’ तेव्हां आम्ही सर्व मंडळी श्री बाबांनी केलेल्या इषाऱ्याप्रमाणें सभोंवार त्यांचे अंथरुणाचे शेजारीं बसलो. मग श्री. बाबांच आवडते भजन आम्हां सर्वांना माहीत होते तें श्री वासुदेवराव सोनावणे यांनीं सुरूं केले...
“गोपाला ! गोपाला ! देवकीनंदन गोपाला”
हे शब्द ऐकून श्री बाबा म्हणाले, नाहीं नाहीं. मी सांगतो तसें म्हणा.

कोणी म्हणो आम्हाला कांहीं ।
त्याची लाज आम्हाला नाहीं ।
आम्ही लागलो हरीचे पायीं ॥

हे भजन ३–४ वेळां सर्वांना म्हणावयास लावून, श्री बाबांनी बसल्या बसल्याच किर्तनाला प्रारंभ केला.

गुरें चारितां गव्हारी ।
माझे म्हणे परी लाभ नाहीं ॥

सर्व जीव संसारांत बुडून राहिले, त्यांना दुसरें कांहीं सुचत नाहीं–दिवसभर हे माझे, ते माझे, सर्व माझे ! असें चालले आहे जगाचें रहाटगाडगें ! जंगलांत गुरें चारणाऱ्या गुराख्याच्या पोराला विचारा–हे बैल कुणाचे ? तो म्हणेल ह्या गाई माझ्या, हे बैल माझे, ह्या बकऱ्या माझ्या ! संध्याकाळ झाली म्हणजे गुरांना पाणवठ्यावर पाणी पाजून, तीं गुरें तो आपआपल्या मालकाच्या घरीं पोचवितो आणि एकटाच घोंगडीं व काठी घेऊन आपल्या घरीं येतो. हातपाय धुवून जेवून झोंपतो. आई त्याला पोटाशीं घेते, त्याचे मुके घेते–कुरवाळते–इतक्या गुरांचा मालक पण त्याचा लाभ त्याला काय ? तसा हा संसार असार आहे. त्यांत कांहीं लाभ नाहीं. संसारसुखाचा करून लाभ पाहिजे असेल तर श्रीतुकोबाराया आपल्या अभंगांत म्हणतात—

**तुका म्हणे कीर्तन पसारा ।**
**लाभ येतो बरा पाहिजे तो ॥**

लाभाची प्रतिक्षा करत फिरावें लागत नाहीं, तो मागावा लागत नाहीं, कर्तव-